# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक २११ * नांदेड * रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६
* पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


## आईचा खून करून मुलाची गळफास घेऊन आत्महत्या

### शहराच्या तरोडा भागातील राहुल कॉलनीतील घटना




**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या तरोडा बुद्रुक परिसरातील राहुल कॉलनीत राहणाऱ्या एका २८ वर्षीय युवकाने आईवर बॅट आणि लोखंडी रॉडने सपासप वार करून तिचा निर्घृन खून केला. त्यानंतर त्याने स्वतः पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी रात्री आठच्या सुमारास घडली.

राहुल कॉलनीतील राहणारे व सध्या सैन्य दलात कार्यरत असलेले बालाजी चौथरे यांची पत्नी भारती चौथरे (वय ५०) आणि त्यांचा मुलगा प्रतीक चौथरे (वय २८) हे राहत होते. अज्ञात कारणावरून प्रतीक चौथरे याने घराचा दरवाजा बंद करून आपली आई भारती हिच्यावर लाकडी बॅट आणि लोखंडी रॉडने डोक्यात सपासप वार करून तिचा खून केला. यानंतर त्यानेही घरातील पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती भाग्यनगर पोलिसांना समजताच पोलीस निरीक्षक संतोष तांबे, पोलीस उपनिरीक्षक विनोद देशमुख यांच्यासह फॉरेंसीकची टीम घटनास्थळी दाखल झाली. त्यानंतर पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनीही घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी दोघांचाही मृतदेह नांदेडच्या विष्णुपुरी येथील रुग्णालयात दाखल केल असून मुलाने आईचा खून का केला? व त्यानेही त्यानंतर आत्महत्या कशामुळे केली? याचा शोध आता पोलीस घेत आहेत. या घटनेमुळे राहुल कॉलनीत खळबळ उडाली आहे.

## नांदेडमध्ये इतरही दोन खुनाच्या घटना

### ५-६ जणांकडून तीक्ष्ण हत्याराने हल्ला, युवक ठार

### बाफना परिसरात एकाचा ठेचून खून

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरात पुन्हा एकदा दोन खुनाच्या घटना घडल्या आहेत. सिडको भागातील शासकीय दुध डेअरीजवळ शनिवारी दुपारी २८ वर्षीय युवकाचा तीक्ष्ण हत्याराने वार करून निर्घृण खून करण्यात आला. या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे. इंदरसिंघ बलजितसिंघ बावरी (वय २८ वर्षे, रा. कौठा, नांदेड) असे मृत युवकाचे नाव आहे. तर बाफना परिसरातही एकाचा दगडाने ठेचून खून करण्यात आल्याची घटना घडली आहे. मृतदेहाची अद्याप ओळख पटली नसून मारेकऱ्यांचा शोध इतवारा पोलीस घेत आहेत.

शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजेच्या सुमारास इंदरसिंघ हा दुध डेअरीजवळ असताना ५ ते ६ जणांच्या टोळीने त्याला गाठले. आरोपींनी अचानक त्याच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार केले. या हल्ल्यात इंदरसिंघचा जागीच मृत्यू झाला. हल्ल्यानंतर सर्व आरोपी पसार झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, इतवाराचे उपविभागीय पोलीस प्रशांत शिंदे, नांदेड ग्रामीण ठाण्याचे अधिकारी तसेच स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला आहे. (पान ३ वर...)







# मले भज्जे पाह्यजे




वऱ्हाडी कथा

आषाढ महिना लागला होता. पावसाची सततधार झळी सुरू होती. सूर्य कधी-कधी फक्त डोकावून बघत काळ्या ढगांमधे लपत होता. पाखरे ओलेचिंब पंख घेऊन मिळेल त्या आडोश्याला आसरा शोधत होती. भर दिवसात सुध्दा सायंकाळ झाल्याचा भास होत होता. थंड हवा पावसाच्या दो-या हलवत, जणू तो वरूण बाळाला झोके देत होता. पाऊस कधी रिमझिम तर कधी इतक्या रपाट्यान पडत होता की, त्याचे थेंब चेह-यावर, हातापायावर जणू बारीक खडे मारल्यासारखे भास होत होते. मातीचा सुगंध इतका अलौकिक होता की,अत्तर सुध्दा फिके वाटत होते. तो मृदगंध मी श्वासात ओढून छातीत वारंवार भरपूर भरून घेत होतो. सर्व शिवार,रान,पडीक जमीन हिर्वीजर्द झाली होती. रानफुले बहरली होती. सर्वत्र हिरवळ पसरली होती. शेतकरी सुखावला होता. रानभाज्यांना ऊत आला होता. जनावरांच्या पोटाची सोय झाली होती.

पावसाळा लागला रे लागला की, भजी खाण्याची मजा काही औरच होती.

मी शाळेतून भिजून घरी आलो. दुपारचे बारा वाजले होते. माझी आई चूल फुंकत भाकर थापत होती. मी निळी स्लीपर ऊंबरठ्या बाहेर काढली, पावसाने भिजलेले दप्तर खुंटीला टांगले.कपडे काढून न्हानीतल्या गंगाळात ठेवले, अंग आईच्या लुगळ्याने पुसले, ओले केस कोरडे केले, घरातील कपडे घातले आणि चूली जवळ जाऊन हात शेकत बसलो. आईचा चेहरा चुलीतल्या आगीने लाल पिवळा दिवस होता.

मा अज भजे करनं व!

कामून अज कोन्चा सन हाय का?

सन नाही पन्, पावसायात खा वाट्टे.

बाप्पा लगे! माजेल गांड भजे मांगते.

माय हासत म्हणाली.

जाय मंग मी नाही जेवत.

अरे बाबू! भजे काय पान्यात शिजू काय? भज्याले तेल,बेसन, सोळा, ओवा पाह्यजे. आपल्या घरात आठ रोजा पासून खा च तेल नाही, बिना तेलाच्या भाज्या बनून राह्यली, अन - तू भजे मांगतं.

जावू दे! नोको बनव्, मंग मले चाराने दे! बब्बू आबाच्या हटेलीतून आनून खातो.

खळकू नाही माह्या जौळ.इतवारी निंदाचे पैसे येतीन मंग करीन भजे, साजरे तासकीभर खाजो.

मले नोको सांगू त्वाली रामकायनी कायी. मले अजच खा चे हायेत,म्हन्जे खाचेच हायेत,कवाही कायी मांगल की, बाबू पैसे नाही, बाबू ढमक नाही, बाबू टमक नायी,त्वाला बायना तोंडपाठ झाला मले. मले अज भजे पाह्यजेन नाहीत मी ऊपाशी राहीनं.

बाबू आपून गरीब हावो.

कामूनं गरीबायनं भजे खावू नोय काय? का, असा कायी नेयम हाय. मले भजे दे नायत मी ऊपाशी राह्यन.

राह्य ऊपाशी राह्यत त,दात पाळून तेल आनाव काय? एकत थो मारवाळी ऊधार देत नाही,अन थ्यात त्वाला हेकेखोरपना,पिसायली बाई मी त ह्या दलिंदरपनाले.

माय वैतागून बोलूनं रडत होती. तीच्या गालावरून अश्रू गळत होते. चुलीच्या अग्नीवर पडत असतांना सू ऽऽऽ सू ऽऽऽ आवाज करत अग्नीला अर्घ्य प्रदान करत होते. तीचे डोळे अग्नीच्या ऊजेडात लालजरद दिसत होते. माय नाकाला पदर लावून नाक पूसत होती. तीच्या हातावरची भाकर ती आता अधीकच जोरात रागारागाने थापत होती, जणू माझावरचा राग ती भाकरीवर काढत होती. नव्हे माझ्यावरचा नव्हे तर गरिबीवरचा राग असेल बहुतेक तो.पण माझा अजाणतेपणा ओळखत नव्हता. चूलीतील चिनग्या फिनिक्स पक्षासारख्या ऊडत होत्या.मायच्या अंगाखांद्यावर बसत होत्या,नि राखेत रूपांतरीत होऊन थंड होत होत्या. गवरीचे खांड चुलीत जळतांना ज्वालामुखी सारखे भासत होते. भाकरीला खो-खो आरावर ठेवून खरपूस,मोवागी, पोपळा येईपर्यंत भाजल्या जात होती.दवळीतील चांदक निर्भयपणे एकट होतं. त्याच्या सोबतीला भाकर येऊन दवडीत पडली. मायने बसल्या - बसल्या एक ताट घेतले, त्यावर अर्धीभाकर तोडून टाकली, मध्यभागी लाल मीरची पावडर टाकले, वरणासाठी जसे भाताचे आळे केले जाते तसे आळे करूनं मायनं मिठ, पाणि टाकले, एक कुटका तोडून चटनी कालवली.

घे बाबू जेव. तुले भूक लागली असनं.

मले त्वा कितीही मिंता केल्या तरी मी जेवनारच नाही म्हनजे नाही. मले अज भजे कोनत्याही हालतीत पाह्यजे म्हनजे पायजेच.

मी आज खूपच जिद्दीला पेटलो होतो. पाह्यजेच मधील च हा शब्द आईला जिव्हारी लागून जणू चटकाच लावत होता. भजी खाण्याची ईच्छा आता अधिकच प्रबळ झाली होती. मायने तीन भाकरी टाकल्या, मला बराचवेळ समजावल पण मी ऐकत नव्हतो. दुपार टळून सायंकाळ झाली. शेजारच्या घरातून तेलकट वास येत होता. मी सहजच फेरफटका मारला तर शेजारच्या घरी जवारीच्या कुरड्या सलू आत्या तळत होती. बेसन भिजवून ती भजे सुध्दा काढत होती. मला त्या शेजारच्या सलू आत्याने आवाज दिला.

बाल्या ये बस, तुले भजे खायाले लै आवळते ना घे पीलेटभर खायं.


शेजारची सलूबाई ना जातीची ना पातीची पन् ती अंत्यत प्रेमळ व मृदू स्वभावाची होती. तीला सुध्दा माझ्याच वयाचा जेमतेम दहा वर्षांचा मुलगा होता. तीचा मुलगा गुलाब अन मी सलूबाईच्या पुढे बसलो, तीने दोन ताट घेतले, ताटात रंगबेरंगी कुरड्या, पापळ अन् मूठ-मूठ भजे टाकून आमच्यापुढे ताट सरकवीले. मी कुरड्यांना हात न लावता पटपट भजे खायलालागलो,सलू आत्याने परत मूठभर भजी माझ्या ताटात टाकले. मी लाजेने हात आडवा करत नकार दिला पण...

खाय रे पोटभर भजे, तुले भजे लै आवळतेत मले ठावूक हाय.

असे म्हणत सलू आत्याने परत गरम भजी ताटात टाकली.मी अंत्यत जलदगतीने फुफु करीत भजी खात होतो. सलू आत्याने परत दोनवेळा मला भजी दिली,माझ पोट भरलं,मी ढेकर दिली, ताटात हात धुतला आणी धूम ठोकत आनंदात घरी गेलो. माय घोरत निझली होती. चिळीच्या मंद प्रकाशात तीच्या गालावरचे आसवांची ओघळछटा मला अस्पष्ट दिसत होती. मला भजी पाहिजे या हट्टाने मी आईला दुखवीले, रडवीले असा स्वतःवर आरोप नी पश्चाताप करून मी दवडी बघीतली, तीनही भाकरी तश्याच होत्या,म्हणजे आई आपल्या हट्टीपणामुळे रडली आणि ऊपाशी झोपली, असा आरोप मी स्वतःवर लावत न्हानीत गेलो. खाल्लेली भजी दोन बोटं नरड्यात घालून खाल्लेली भजी सर्व ओकारीने पाडली. हात पाय धुतले,पुसले आणि अंगावर देशमुखी घेऊन मनातल्या मनात म्हटल आता मी भजी कधीच खाणार नाही.

**-सु. पुं. अढाऊकर**
अकोला
मो. ९७६९२०२५९७

# ध्येयवेडे लोकच इतिहास घडवतात; '९ ऑगस्ट क्रांती दिन'



ध्येयवेडे लोकच इतिहास घडवितात.अशी म्हण सर्वत्र प्रचलित आहे.आपल्या कर्तृत्वाने,पराक्रमाने ज्या क्रांती कारकांनी इतिहास घडविला त्या असामान्य व्यक्तीचे स्मरण व्हावे, त्यांच्या कार्यकर्तृत्वाची माहिती नवीन पिढीला व्हावी. त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळावी. व त्यांच्या सारखे असामान्य कार्य नवीन पिढीच्या हातून घडले जावे. पारतंत्राच्या जुलमी गुलामगिरीतून आपल्याला भारत मातेच्या स्वातंत्र्या करिता प्राणाची आहुती देणाऱ्या क्रांतीकारकांचा आदर्श आपण घ्यावा व त्यांच्या बलिदानातून मिळालेल्या स्वातंत्र्याची मधुर फळे चाखताना त्यांच्या पराक्रमाचे गोडवे या पुढील पिढीने गावेत.

या दृष्टिकोनातून ९ ऑगस्ट हा क्रांती दिन संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. भारतीय इतिहासाचे दर्शन या लेखातून केले जाणार आहे.त्यासाठीच हा लेखन प्रपंच...भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ज्यांनी आपले बलिदान दिले आहे. त्यांचे विचार हे समाजाला प्रेरणादायक असेच आहेत. आपण जीवन जगत असताना आपल्या ठिकाणी जिज्ञासा पाहिजे. कोणतेही काम करत असताना माणूस जागरूक असला पाहिजे.

संपूर्ण भारतभर ९ऑगस्ट हा क्रांती दिन स्वातंत्र्यासाठी बळी दिलेल्या व्यक्तीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. ७ ऑगस्ट १९४२रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर फार मोठे अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद होते. ब्रिटिशांनी भारत सोडून जावे. या राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने वर्धा या ठिकाणी झालेल्या ठरावानुसार मुंबई येथे अधिवेशनात शिक्कामोर्तब होणार होते. देशातील बहुसंख्येने लोक एकत्रित आले होते. छोडो भारत ठराव ८ऑगस्ट रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडला.तो बहुमताने मंजूर झाला.

महात्मा गांधीजींनी या *क्षणापासून तुमच्यापैकी प्रत्येक स्त्री-पुरुषाने आपण स्वतंत्र झालो आहोत, असे समजले पाहिजे* आणि स्वतंत्र भारताचा नागरिक म्हणून प्राणपणाने लढले पाहिजे.

असे सांगितले. त्यासाठी तुम्ही *करा किंवा मरा* आता नाही तर केव्हाच नाही. असे भावनिक उद्गार काढले. त्यामुळे लोकांच्या मनात स्फुर्तीदायी वातावरण तयार झाले. आणि नऊ ऑगस्ट हा क्रांती दिन खरोखरच इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहावा इतका महत्त्वाचा ठरला.

इंग्रजांना पळती भुई थोडी झाली. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार ,राष्ट्रीय शिक्षण या चतु:सूत्रीचा वापर करून इंग्रजांना सळो की पळो करून सोडले.शेकडो लोकांचे बलिदान देण्यात आले. त्यामुळे प्रत्येक भारतीय स्वाभिमानाने या क्रांतीमध्ये सामील झाले आणि खरोखरच इंग्रजांना आपला पाय काढता घ्यावा लागला.आणि भारत १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला. त्यामुळे आज आपण गुण्यागोविंदाने जीवन जगत आहोत. परंतु तरुण पिढीला या स्वातंत्र्याचे काही घेणे राहिले नाही. शासकीय कार्यालये ,निमशासकीय ठिकाणी येथे फक्त औपचारिकता म्हणून क्रांती दिन साजरा केला जातो. आज आपण पाहत आहोत. आज अनेक तरुण रीलच्या नादात आपला अमूल्य वेळ वाया घालवत आहेत. देशाबद्दल त्यांना काही घेणं- देणं राहिलं नाही. हा देश माझा। याचे भान जरासे राहू द्या।।, रे म्हटलं तरी लोकं भानावर येत नाहीत. अमेरिकन राज्यक्रांती, रशियन क्रांती, फ्रेंच क्रांती, औद्योगिक क्रांती या सर्व क्रांती तरुणांनीच घडून आणल्या. जेव्हा जेव्हा मनुष्यावर अन्याय, अत्याचार होतो. तेव्हा तरुण वर्ग सुडाने पेटून उठतो. आपल्यावर हुकूमशाही गाजवणारे राजे, महाराजे यांना धडा शिकवण्याचं काम या क्रांतीने केले. औद्योगिक क्रांती का घडली. ती कोणत्या देशात झाली.

हे आपणास माहीत आहे. म्हणून आपल्या देशातही नऊ ऑगस्टची क्रांती ही मोठ्या थाटामाटाने साजरी केली पाहिजे. परंतु होत नाही ही शोकांतिका आहे .

जर असंच चालत असेल तर स्वातंत्र्य हा शब्द काही दिवसानंतर लोप पावेल असे मला वाटते. आपला देश या देशातील संस्कृती या देशाची मानचिन्हे आपणाला सांभाळायचे आहेत. परत आपण गुलामीत जाऊ नये. यासाठी तरुणांनी स्वाभिमानाने जीवन जगले पाहिजे. आपले शासन आपल्याच विद्यार्थ्यांवर काठ्या उगारत असेल तर काय म्हणावे? 'असा प्रश्न तरुणांना समोर उभा राहिला आहे. आपल्यावर लाठी हल्ले केले. त्यामुळे समाजातील बराच तरुण वर्ग आता जागा झाला आहे. अन्याय, जुलमी सत्ता मतपेटीतून उलथवून टाकता येते.

हे ९ ऑगस्ट क्रांतीने दाखवून दिले आहे. क्रांती दिनाच्या सर्वांना खूप खूप शुभेच्छा..

**-प्रा. विठ्ठल बरसमवाड**
अहिल्या नगर

# ऑगस्ट क्रांती दिन

करेंगे या मरेंगे या निर्धारपूर्ण घोषणेने संपूर्ण देशाला प्रेरणा देत ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला नवे बळ मिळाले. हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन किंवा भारत छोडो आंदोलन दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. हा दिवस केवळ इतिहासातील एक घटना नसून भारतीयांच्या अदम्य देशभक्तीचा, त्यागाचा आणि स्वातंत्र्याच्या तीव्र आकांक्षेचा साक्षीदार आहे.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंग्रजांनी भारतीय नेत्यांचा विश्वासघात केला. भारताला स्वातंत्र्य देण्याबाबत कोणतीही ठोस भूमिका न घेतल्याने जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. याच पार्श्वभूमीवर ८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईतील गोवालिया टँक मैदानावर (आजचे ऑगस्ट क्रांती मैदान) अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या अधिवेशनात महात्मा गांधींनी भारत छोडो आंदोलनाची घोषणा केली. त्यांनी देशवासीयांना करेंगे या मरेंगे हा मंत्र दिला आणि इंग्रजांनी भारत त्वरित सोडावा, अशी ठाम मागणी केली.

९ ऑगस्टच्या पहाटेच महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना आझाद यांच्यासह अनेक राष्ट्रीय नेत्यांना इंग्रजांनी अटक केली. मात्र नेत्यांच्या अटकेने आंदोलन थांबले नाही. उलट संपूर्ण देशभर विद्यार्थी, शेतकरी, कामगार, महिला आणि सामान्य नागरिक स्वयंस्फूर्तीने रस्त्यावर उतरले. अनेक ठिकाणी मोर्चे, संप, निदर्शने, सरकारी कार्यालयांवर बहिष्कार आणि ब्रिटिश सत्तेविरुद्ध तीव्र आंदोलन सुरू झाले.

ब्रिटिश सरकारने हे आंदोलन दडपण्यासाठी लाठीमार, गोळीबार, अटकसत्र आणि कठोर दडपशाहीचा अवलंब केला. हजारो आंदोलनकर्त्यांना तुरुंगात डांबण्यात आले, अनेकांना प्राणांची आहुती द्यावी लागली. तरीही भारतीयांचा स्वातंत्र्याचा निर्धार ढळला नाही. अनेक तरुणांनी भूमिगत राहून गुप्तपणे आंदोलन सुरू ठेवले. अरुणा आसफ अली, उषा मेहता, जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया यांसारख्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी या आंदोलनाला नवे बळ दिले. उषा मेहतांनी सुरू केलेल्या गुप्त काँग्रेस रेडिओने स्वातंत्र्याचा संदेश देशभर पोहोचवला.



या आंदोलनाने ब्रिटिश सत्तेचा पाया हादरवला. इंग्रजांना हे स्पष्ट झाले की भारतीयांना कायम गुलाम ठेवणे आता अशक्य आहे. जरी १९४२ मध्ये स्वातंत्र्य मिळाले नाही, तरी याच आंदोलनामुळे स्वातंत्र्यप्राप्तीची प्रक्रिया वेगाने पुढे सरकली आणि अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला.

आज स्वातंत्र्यानंतर जवळपास आठ दशके उलटून गेली असली, तरी ऑगस्ट क्रांती दिनाचे महत्त्व अजूनही तितकेच आहे. स्वातंत्र्य म्हणजे केवळ परकीय सत्तेपासून मुक्ती नव्हे; तर लोकशाही मूल्यांचे रक्षण, संविधानाचा सन्मान, सामाजिक समता, राष्ट्रीय एकात्मता आणि नागरिक म्हणून आपल्या कर्तव्यांचे प्रामाणिक पालन हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

आजच्या पिढीने स्वातंत्र्यसैनिकांचा त्याग केवळ पुस्तकांपुरता मर्यादित न ठेवता त्यांच्या विचारांमधून प्रेरणा घ्यावी. देशप्रेम, प्रामाणिकपणा, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान देण्याची भावना प्रत्येक भारतीयामध्ये रुजली, तर तीच ऑगस्ट क्रांती दिनाला खरी आदरांजली ठरेल.

ऑगस्ट क्रांती दिन हा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील निर्णायक टप्पा असून, लाखो ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यवीरांच्या बलिदानाची आठवण करून देणारा प्रेरणादायी दिवस आहे. त्यांच्या संघर्षामुळेच आपण आज स्वतंत्र भारतात मुक्तपणे जगत आहोत. त्यामुळे हा दिवस प्रत्येक भारतीयाने अभिमानाने, कृतज्ञतेने आणि राष्ट्रनिष्ठेच्या भावनेने साजरा करणे हेच त्यांना खरी मानवंदना ठरेल.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# प्रेम

दहा वर्षांनी दोघे समोरासमोर आली,
अचानक एकमेकांची भेट आज झाली
तिला पाहताच त्याचा राग उफाळून आला
खरेच प्रेम होते माझ्यावर की देखावा होता केला
विरहाचे चटके दिसत नाहीत मनावर
पहिल्यापेक्षा आनंदाचे भाव होते तिच्या चेहऱ्यावर
भांडण छोटेसे तरी दहा वर्षे राहिली
ना मेसेज ना एक फोन ती करू शकली
फसवे होते प्रेम तिचे म्हणूनच खुश दिसतेय
इतक्या वर्षांनी भेटूनही सारखी हसतेय
मनातला राग लपवत त्याने तिला विचारले
'कशी आहेस ?'
'पुस्तकात ठेवलेल्या पर्णाची जाळी व्हावी
अगदी तशीच आहे.'
त्याने तिला विचारले
'कुठे रहातेस ?'
'माणसांच्या गर्दीतून लांब वेगळ्याच जगात वास्तव्य करते.'
त्याने तिला विचारले 'घरचे सर्व कसे आहेत ?'
'सर्वजण ठीक, मीच त्यांच्यापासून लांब आहे.'
ठीक आहे म्हणून तो तेथून होता निघाला
थांब ना, जरा म्हणत तिने त्याला थांबवला
भेटला आहेस, तर चल माझ्या घरी जाऊ
गप्पा-गोष्टी करत रस्त्याने थोडा वेळ एकत्र चालू
खरे तर प्रचंड चीड आली होती त्याला
गळा दाबून आताच ठार करावे तिला
छोट्याशा भांडणाने सोडून गेली मला
दहा वर्षांच्या काळात कधीच आठवलो नाही का मी तिला ?
दाबून विचार मनातले तिच्यासंगे चालू लागला
चालता चालता एका अनोळखी वाटेवर येऊन पोहोचला
त्याला पाहून हसून ती म्हणाली,
दमला असशील तर थोडा आराम कर
थोडीशी ताकद पुन्हा नव्याने पायात भर
हसणे तिचे पाहून मनात त्याच्या आले
काही वर्षांपूर्वी याच हसूने तिच्या प्रेमात मला पाडले
थोड्याच वेळात ती म्हणाली,
चल आता चालूया
जवळच आहे घर माझे आराम बाजूला सारुया
उठून चालताना त्याला दूरवर कुठेच घरे नाही दिसली
कशावरून हिला घर जवळ आल्याची चाहूल लागली
आले माझे घर म्हणत ती तिथेच थांबली
आत नको येऊ तू तुझ्यासाठी ही जागा नाही चांगली
कुठे आहे घर? हे कुठले ठिकाण?
सर्वत्र दिसतेय चिता जाळणारे स्मशान
दहा वर्षे झाली एका अपघाताने श्वास माझा संपला
निर्जीव देहाला लोकांनी इथेच आणून जाळला
जुने घर सुटले नाते सर्वांशी तुटले
तेव्हापासून इथेच माझे नवीन घर मी थाटले
शेवटच्या श्वासाला इच्छा होती एकच माझी
भांडण आपले मिटून भेट व्हावी तुझी
म्हणूनच वेड्या वाट तुझी पाहात होते
इकडे-तिकडे भटकत फक्त तुलाच तर शोधत होते
छोटेशे भांडण पर्णाच्या जाळीसारखी जपले
म्हणूच लोकांच्या गर्दीतून लांब वास्तव्यास आले
तू येशील कधीतरी म्हणून डोळे वाटेकडे लावले
पाहून आज तुला माझी मीच धन्य झाले
आज तू भेटलास माझी झाली इच्छापूर्ती
तुला भेटून आज मिळाली मला खरी मुक्ती
बोलता बोलता तिचे डोळे होते पाणावले
आत्म्यानेही रडावे इतके प्रेम तिने होते केले
गैरसमज होता जो आज त्याचा संपला
फसवे प्रेम नव्हते तिचे दोष तिच्यावरचा मिटला
अपघाताने तिचा जीव होता घेतला
म्हणूनच इतकी वर्षे ना फोन ना मेसेज तिचा भेटला
ऐकून सर्व तिचे तो जागीच कोसळला
न संपणारा पूर डोळ्यांतून ओसंडून वाहू लागला
इतक्या वर्षांनी आज ती दोघे भेटली
आत्मा बनूनही ती त्याच्यासाठी दहा वर्षे होती थांबली.

**-कु. ज्योती रावराणे,**
कांजूरमार्ग, मुंबई

# चंद्र..!

चंद्राच्या शीतलतेला
आठवणींचा सुगंध.
पापणीच्या पंखांसोबत
गुलाबी गालही चिंब.
मन चांदण होत
अन...देह नभांगण
विरहाचा चांदवा
सहात हे मन
धूसर चांदणे
श्वासात बिलगावे
तुला पाहून
चंद्रानेही लाजावे.
ओंजळीत चंद्र,
अधीर झाली स्पंदन
बावरलेल्या क्षणी
तुझ्यावर जडल मन

**-रुपाली वागरे/वैद्य**
नांदेड

# 'हरित नांदेड' अभियानांतर्गत हनुमानगड परिसरात वृक्षारोपण

## खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते भक्त निवासाच्या कामाचे भूमिपूजन



**नांदड (प्रतिनिधी)**– शहराला पर्यावरणपूरक आणि सुंदर बनवण्यासाठी 'हरित नांदेड अभियान' अंतर्गत नागरिकांनी व सामाजिक संस्थांनी जास्तीत जास्त वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करावे, असे आवाहन खा. अशोकराव चव्हाण यांनी केले.

महानगरपालिका, गुरुद्वारा लंगर साहिब आणि वृक्ष मित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त पुढाकाराने हे अभियान राबविले जात आहे. नागरिकांकडून या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

या अभियानाचा एक भाग म्हणून मनपाच्या क्षेत्रीय कार्यालय क्र. २, अशोकनगरच्या वतीने शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी हनुमानगड परिसरात ट्री गार्डसह भव्य वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली. प्रत्येक रोपट्याला ट्री गार्ड बसवून जनावरांपासून संरक्षण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

याप्रसंगी श्रीक्षेत्र हनुमान गड देवस्थान परिसरात येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी 'भक्त निवासस्थान' इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन खासदार अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महापौर कविता संतोष मुळे, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, महंत गरुडदासची त्यागी महाराज, आमदार अमर राजूरकर, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले, सभागृह नेता महेश कनकदंडे, शिक्षण महिला व बालकल्याण सभापती सदिच्छा सोनी पाटील, उपसभापती निरंजना लांडगे, गटनेता संदीपसिंग गाडीवाले, माजी महापौर बलवंतसिंग गाडीवाले, नगरसेवक किशोर स्वामी, माजी महापौर शैलजा स्वामी आदींसह नगरसेवक, अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेवक किशोर स्वामी यांनी केले. ते म्हणाले, खा. अशोकराव चव्हाण मुख्यमंत्री असताना हनुमान गड परिसराचा विकास झपाट्याने झाला. त्यांनी हनुमानगड परिसरातील विकास कामांसाठी, प्रभागातील रस्ते व अभ्यासिका यासाठी वाढीव निधीची मागणी केली. तसेच विमानतळ व एमजीएम कॉलेज परिसरातील पाणी निचऱ्यासाठी उपाययोजना करण्याची विनंती केली.

**पर्यावरण रक्षणासाठी लोकचळवळ गरजेची –खा. अशोकराव चव्हाण**

हवामान बदलाच्या संकटाचा सामना करण्यासाठी केवळ शासकीय प्रयत्न पुरेसे नाहीत. 'हरित नांदेड' ही लोकचळवळ बनली पाहिजे. वृक्ष लावणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच ते जगवणेही गरजेचे आहे. श्रीक्षेत्र हनुमान गड हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. येथील भक्त निवास नांदेडच्या धार्मिक पर्यटनाला अधिक सोयीस्कर ठरेल, असे मत खा. अशोकराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

# सिडको–हडको क्षेत्रीय कार्यालयात महापौरांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

## नागरी समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे अधिकाऱ्यांना कडक निर्देश



**नांदेड (प्रतिनिधी)**– महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालय क्र. ६, सिडको– हडको अंतर्गत येणाऱ्या विविध नागरी समस्यांवर नागरिकांना दिलासा देण्यासाठी महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी एक महत्त्वाची आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीत पाणीपुरवठा, मलनिस्सारण, स्वच्छता, बांधकाम आणि विद्युत विभागाच्या कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीला स्थानिक नगरसेवक संजीव घोगरे, संजय मोरे, अभिषेक सौदे, काळे पाटील, काकडे, महापौर प्रतिनिधी संतोष मुळे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, निलेश सुंकेवार, उपायुक्त नितीन गाढवे, शहर अभियंता सुमंत पाटील, सहायक आयुक्त मो. गुलाम सादेक, उपअभियंता प्रकाश कांबळे, सतीश ढवळे, क्षेत्रीय अधिकारी डॉ. मिर्झा बेग, कनिष्ठ अभियंता, ठाणेदार आणि संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

सिडको – हडको परिसरातील काही भागांमध्ये होणारा विस्कळीत पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करण्याचे निर्देश महापौरांनी दिले. मुख्य जलवाहिन्यांची गळती शोधून ती तातडीने दुरुस्त करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तसेच दैनंदिन वापरामुळे तुंबलेल्या मलनिस्सारण वाहिन्यांची स्वच्छता प्राधान्याने करावी, असे निर्देश दिले.

बैठकीत सिडको–हडको भागात विलंबाने पाणीपुरवठा होत असल्याने नगरसेवकांनी आक्रमक भूमिका घेतली. तसेच नव्याने वाढणाऱ्या लोकवस्तीसाठी पाणीपुरवठा लाईन टाकण्याची मागणीही केली.

नगरसेवकांची मागणी विचारात घेऊन अधिकाऱ्यांनी संबंधित प्रभागातील नगरसेवकांशी समन्वय साधून कामे पूर्ण करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या. स्वच्छता विभागाचा आढावा घेताना सफाई कर्मचाऱ्यांची कमतरता आणि घंटागाड्यांची संख्या वाढवण्याची मागणी नगरसेवकांनी केली.

यावेळी महापौर मुळे यांनी प्रभागातील अंतर्गत रस्त्यांवरील कचरा दररोज वेळेवर उचलण्यात यावा. प्रत्येक गल्लीत घंटागाडी नियमित पाठविण्यात यावी आणि ओला–सुका कचरा वर्गीकरण करून घ्यावे, असे निर्देश दिले.

# शक्तिपीठ जोगवा यात्रा १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान नांदेडमध्ये; निखिल लातूरकर यांचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)**– विश्वशांती, विश्वकल्याण, धर्मकार्य आणि संस्कृती संवर्धनाचा संदेश देणारी श्रीक्षेत्र तुळजापूर ते श्रीक्षेत्र तुळजापूर शक्तिपीठ जोगवा यात्रा १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान नांदेड शहरात येत आहे. शहरातील सर्व दत्तभक्त व देवीभक्तांनी या दुर्मिळ आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर यांनी केले आहे.

गुरुतत्त्व प्रदीप आयोजित श्री दत्त दुर्गा महानुष्ठानम्‌निमित्त मकरंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ही यात्रा काढण्यात आली आहे.

यात्रेत आई तुळजाभवानीची मूर्ती, जोगव्याची परडी तसेच भगवान श्रीदत्तप्रभूंच्या पावन पादुका भाविकांच्या दर्शनासाठी उपलब्ध राहणार आहेत. प्रत्येक ठिकाणी भवानी पूजन, परडी पूजन, नामस्मरण, गोंधळ पदे आणि जोगवा संकलनाचे कार्यक्रम होणार आहेत.

शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी हडको येथील दत्तकृपा मंगल कार्यालयात यात्रेचे आगमन होणार असून, दि. १६ ऑगस्ट रोजी अंबिका मंगल कार्यालयात श्री दत्त यागाचे आयोजन, त्यानंतर विवेकानंद नगर परिसरात यात्रेचे दर्शन होणार आहे. सोमवार, दि. १७ ऑगस्ट रोजी मुक्तेश्वर आश्रम (वसंतनगर), हनुमान मंदिर (विद्युतनगर), हनुमान मंदिर (अशोकनगर) आणि श्री गजानन महाराज मंदिर (मालेगाव रोड) येथे भाविकांना दर्शन व जोगवा अर्पणाची संधी मिळणार आहे.

श्रद्धेनुसार धान्यरूपी किंवा धनरूपी जोगवा अर्पण करून भाविकांनी विश्वकल्याणाच्या या ईश्वरी कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. संकलित होणारा जोगवा श्रीक्षेत्र तुळजापूर येथे होणाऱ्या श्री दत्त दुर्गा महानुष्ठानम्, महायज्ञ, अन्नदान व विविध सेवाकार्यासाठी वापरण्यात येणार आहे.

यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर म्हणाले, श्रावण महिन्यात येणारी ही जोगवा यात्रा भाविकांसाठी आध्यात्मिक ऊर्जा आणि भक्तीभावाचा अनोखा संगम आहे. नांदेडकरांनी कुटुंबासह मोठ्या संख्येने उपस्थित राहून आई जगदंबा आणि श्री दत्तगुरूंचे दर्शन घेऊन या पवित्र उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

# तुकाराम शिंदे यांची नांदेड दक्षिण तालुकाध्यक्षपदी निवड



**नांदेड (प्रतिनिधी)**– टेन्ट हाऊस, मंगल कार्यालय, केटरर्स व डेकोरेटर्स ओनर्स वेल्फेअर असोसिएशनच्या नांदेड दक्षिण तालुकाध्यक्षपदी तुकाराम बापूराव शिंदे (सचिन पाटील) यांची निवड करण्यात आली आहे.

मागील २५ वर्षांपासून ते टेन्ट व केटरिंग व्यवसायात कार्यरत असून, ते नवीन कौठा परिसरातील रहिवासी आहेत. त्यांच्या निवडीबद्दल संघटनेचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष दडूशेठ पुरोहित, नांदेड जिल्हाध्यक्ष विजयसिंह परदेशी, राज्याचे कोषाध्यक्ष तथा नगरसेवक आशिष नेरलकर, गोविंद शुक्ला, अनिल कांबळे, केशव खिचडे व अनुराग जाजू यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात काढण्यात आला आक्रोश मोर्चा



**हदगाव (प्रतिनिधी)**– महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण करण्याच्या निर्णयाविरोधात अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी कृती समितीच्या वतीने शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट रोजी हदगाव येथे जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. हजारो भीमसैनिक, महिला, युवक व समाजबांधवांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे मोर्चाने संपूर्ण शहराचे लक्ष वेधून घेतले.

आझाद चौकातून सकाळी सुरू झालेला मोर्चा शहरातील प्रमुख मार्गांवरून तहसील कार्यालय येथे पोहोचला. येथे मोर्चाचे जाहीर सभेत रूपांतर झाले. यावेळी उपस्थितांनी जय भीम, जय संविधान, छत्रपती शिवाजी महाराज की जय आणि आरक्षणाच्या संरक्षणाच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. सभेत विविध वक्त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या उपवर्गीकरणाच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेत बदर समितीचा अहवाल तत्काळ सार्वजनिक करावा, अशी मागणी केली. तसेच सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करणे बंधनकारक केलेले नाही. त्यामुळे राज्यातील जनभावना लक्षात घेऊन 'अ, ब, क, ड' उपवर्गीकरणाची प्रक्रिया तत्काळ थांबवावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली.

हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी दादासाहेब शेळके, माजी उपनगराध्यक्ष सुनील सोनुले, संदीप दवणे, देवानंद पाईकराव, ॲड. धम्मपाल पाईकराव, सिंघम ढगे, सुशील भालेराव, राष्ट्रपाल सावरकर, कैलास राऊत, राजेश राऊत, माधव वाढवे, भारतीय बौद्ध महासभा हदगाव आणि चर्मकार समाजाचे विशाल घोडेकर, दिलीप गंधारे, गजानन गंगासगरे, माधव सूर्यवंशी यांनी मागील आठवडाभर सूक्ष्म नियोजन करून मोर्चा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

यावेळी वक्त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक न्यायाच्या तत्त्वावर उभी केलेली अनुसूचित जातीतील ५९ जातींची वज्रमुठ तोडण्याचे हे राजकीय षडयंत्र असून ते कोणत्याही परिस्थितीत यशस्वी होऊ देणार नाही, असा संतप्त आरोप केला. आरक्षणाचे विभाजन समाजाच्या ऐक्यावर घाला घालणारे असल्याचेही त्यांनी नमूद केले. सभेनंतर मोर्चेकऱ्यांनी तहसील कार्यालयावर जाऊन निवेदन सादर केले. उपवर्गीकरणाचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. मोर्चादरम्यान शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शांततापूर्ण वातावरणात पार पडलेल्या या महामोर्चामुळे काही काळ वाहतुकीवर परिणाम झाला. हदगाव तालुक्यातील आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते, महिला, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**पान १ वरून...**

**नांदेडमध्ये इतरही दोन....**

**गँगवारचा संशय**

सदरील खून जुन्या टोळी युद्धातून झाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. काही दिवसांपूर्वी एका गुन्हेगारी टोळीतील काही सदस्य जामिनावर सुटले होते. खुनाचे नेमके कारण आरोपींच्या अटकेनंतरच स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, जोपर्यंत आरोपींना अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका मृताच्या नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात घेतली होती. पुढील तपास नांदेड ग्रामीण पोलीस करत आहेत. शहरातील कायदा–सुव्यवस्थेच्या प्रश्नावरून नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.

**बाफना परिसरातही खुनाची घटना**

शहराच्या इतवारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत बाफना टी पॉईंट परिसरात एका भंगार वेचणाऱ्या अनोळखी युवकाचा डोक्यात दगड घालून खून केल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. एका ऑटोमोबाईलच्या दुकानासमोर सदर मृतदेह पडल्याचे दुकान उघडण्यासाठी गेलेल्या व्यापाऱ्याच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ इतवारा पोलिसांना कळविले. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण आगलावे तसेच आदी अधिकारी, कर्मचारी यांनी घटनास्थळ गाठले. फॉरेन्सिक लॅबच्या पथकालाही पाचारण करण्यात आले. मृतदेहाची अद्याप ओळख पटली नसून त्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमध्ये मारेकरी कैद झाले असून, त्यांचा शोध पोलीस घेत आहेत. सायंकाळी उशिरापर्यंत मृतदेहाची ओळख पटली नसल्याचे इतवारा पोलिसांनी सांगितले.

# बारडमध्ये कर्णकर्कश आवाजाला नागरिक वैतागले

## विनापरवाना लाकूड कटाई मशीनवर कार्यवाहीची मागणी

**मुदखेड (प्रतिनिधी)**– मुदखेड तालुक्यातील बारड येथील ओम शांतीनगर परिसरात गेल्या अनेक वर्षापासून विनापरवाना सुरू असलेल्या लाकूड कटाई मशीनमुळे होत असलेल्या कर्णकर्कश आवाजास नागरिक वैतागले आहेत. तसेच वस्तीत वास्तव्य करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून यासंदर्भात वन विभाग, स्थानिक प्रशासन, पोलीस प्रशासन व संबंधित विभागाकडे वारंवार तक्रार करूनही ठोस कार्यवाही केली जात नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

ओम शांतीनगर वस्तीत वास्तव्यात असलेले दत्ता मल्हारी लोणे यांनी यासंदर्भात वनविभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. लाकूड कटई व्यवसायासाठी दिवसभर मशीनचा वापर केला जात असून, कर्ण कर्कश आवाजाचा नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासात अडथळे निर्माण होत असून, वृद्ध, रुग्ण, आजारी व्यक्ती, महिला यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागत असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. यापूर्वी संबंधित विभागाने वस्तीतील नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन लाकूड कटाई मशीन इतरत्र हलविण्यात आली होती. परंतु पुन्हा आता भरवस्तीत लाकूड कटई व्यवसाय जोमात सुरू आहे. विनापरवाना सुरू असलेल्या व्यवसायाची चौकशी करून कर्ण कर्कश आवाज बंद करण्याची मागणी वस्तीतील नागरिकांनी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तक्रारीची दखल घेऊन विनापरवाना लाकूड कटई मशीन चालकास नोटीस बजावली आहे. परंतु याचा कुठलाही परिणाम लाकूड व्यावसायिकावर झाल्याचे दिसून येत नाही. तक्रारदारांनी यासंदर्भात पुन्हा वनविभागास विचारणा केली असता ग्रामपंचायतची परवानगी असल्याचे उत्तर देऊन मोकळे झाले आहे. ग्रामपंचायत कार्यालयास याबाबत विचारणा केली असता कुठलीही परवानगी दिली नसल्याचे सांगून मोकळे झाले आहे.

# सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ११ ऑगस्ट रोजी पेन्शन अदालत

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी ११ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी, कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री आरोग्य जनकल्याण समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– मुख्यमंत्री आरोग्य जनकल्याण समितीची सिडको येथील मातृसेवा आरोग्य केंद्रात नुकतीच बैठक पार पडली. या बैठकीत समितीतील सदस्य तथा प्रभाग क्रमांक २० मधील सर्व नगरसेवक यांच्या उपस्थितीत विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

सिडको येथील मातृ सेवा आरोग्य केंद्र येथे आरोग्य 'जनकल्याण समिती अर्थात (महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य वैद्यकीय मदत) ही समिती स्थानिक आरोग्य केंद्राच्या विकासासाठी काम करत असून या समितीची बैठक दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी आरोग्य जनकल्याण समितीचे सदस्य विद्यमान नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, सौ.सुवर्णा सतिश बसवदे, मंगलाताई देशमुख, सौ. निरंजना लांडगे, नगरसेविका प्रतिनिधी उदय देशमुख यांच्या उपस्थितीत पार पडली.

आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संतोष शिंदे व आरोग्य कर्मचारी आशा वर्कर यांच्याशी विविध मुद्द्यावर चर्चा करून सिडको येथील आरोग्य केंद्रात महिला डॉक्टर, बालरोग तज्ज्ञ डॉक्टर, परिचारिका व सेवक यांची पूर्तता करण्याची मागणी करण्यात आली. तसेच या ठिकाणी अंतररुग्ण विभाग व त्यासाठी लागणारे कर्मचारी वर्ग व औषध पुरवठा वेळेवर उपलब्ध करून देण्याबरोबरच सर्व सुविधांची मागणी आरोग्य अधिकारी डॉ. संतोष शिंदे व आरोग्य कर्मचारी, आशा वर्कर यांनी केली.

# युनिव्हर्सल इको क्लबचा स्तुत्य उपक्रम; कामठा जिल्हा परिषद शाळेतील मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता जनजागृती



**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील युनिव्हर्सल एज्युकेशनल, सोशल अँड कल्चरल सोसायटीच्या युनिव्हर्सल इको क्लब अंतर्गत आणि ज्योत कौर जितेंद्रसिंह पहाडिया यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद शाळा, कामठा येथे मुलींसाठी स्वयं– जागरूकता, वैयक्तिक स्वच्छता व मासिक पाळी स्वच्छता जनजागृती कार्यक्रम नुकताच घेण्यात आला.

या कार्यक्रमात किशोरवयीन मुलींना मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची स्वच्छतेची काळजी, योग्य आरोग्यदायी सवयी तसेच मासिक पाळीविषयीचे गैरसमज दूर करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. सत्रानंतर उपस्थित सर्व मुलींना मोफत सॅनिटरी नॅपकिनचे वाटप देखील करण्यात आले.

या उपक्रमात एमजीएम महाविद्यालयाच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यांनी जनजागृती अभियान आणि सॅनिटरी नॅपकिन वाटपात मोलाचे सहकार्य केले.

कार्यक्रमाला रोटरी क्लबच्या सचिव सुनंदा डबणे, श्रीमती रेखा, श्रीमती पाटील तसेच श्रीमती डॉ. पतंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी मुलींना मासिक पाळी स्वच्छतेचे महत्त्व पटवून देत आरोग्यदायी जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना प्राचार्या ज्योत कौर जितेंद्रसिंह पहाडिया म्हणाल्या, मुलींच्या आरोग्य, स्वच्छता आणि सक्षमीकरणासाठी जनजागृतीपर उपक्रमांची आवश्यकता आहे. युनिव्हर्सल इको क्लबच्या माध्यमातून भविष्यातही आरोग्य, पर्यावरण व सामाजिक जनजागृतीसाठी विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असे जाहीर करण्यात आले.

# न्यायालयाच्या आदेशानुसार नांदेड वजिराबाद पोलिसांची कारवाई; ४ प्रकरणांतील ७ फरार आरोपींची नावे जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)**– येथील मुख्य न्याय दंडाधिकारी यांच्या आदेशानुसार वजिराबाद पोलीस ठाण्यातील चार वेगवेगळ्या प्रकरणांमधील सात फरार आरोपींविरुद्ध भारतीय नागरिक सुरक्षा संहिता बीएनएसएस कलम ३५६ अन्वये कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

सदर प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असून, आरोपी गेल्या अनेक वर्षांपासून फरार आहेत. आरोपींना शोधून न्यायालयासमोर हजर करण्याच्या उद्देशाने न्यायालयाने त्यांची माहिती स्थानिक वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. जेणेकरून संबंधित आरोपी अथवा त्यांचे नातेवाईक यांना याची माहिती मिळून ते स्वेच्छेने न्यायालयासमोर हजर होतील.

नियमित फौजदारी खटला क्र. ६८६/२०१० मधील मोहम्मद फेरोज मोहम्मद मुस्तफा कुरेशी रा. हमीदिया कॉलनी, देगलूर नाका, नांदेड, मोहम्मद आरिफ अब्दुल रहीम रा. तिसमनपल्ली, ता. डीचपल्ली, जि. निजामाबाद (तेलंगणा राज्य), नियमित फौजदारी खटला क्र. ४६९/२००९ मधील गोविंद रामलाल जोशी रा. गायत्री मंदिराजवळ, नवीन पूल, नांदेड नियमित फौजदारी खटला क्र. ३१५७/१९९७ मधील नवाबखान गुलाबखान रा. मालेगाव, जि. नाशिक, नियमित फौजदारी खटला क्रमांक ९३८ /२००२ शेख सादिक शेख चांद राहणार करखेली तालुका धर्माबाद, महेमूद खान उस्मान खान पठाण राहणार ज्ञानेश्वर नगर पाठीमागे सहयोग कॉलनी परभणी आणि नियमित फौजदारी खटला क्रमांक ९८८/ २००२ सज्जाद हुसेन जाफर हुसेन राहणार रेल्वे स्टेशन जवळ नांदेड असून, हे प्रकरण मागील १९९७ पासून प्रलंबित आहे.

# 'आम्ही वारकरी' परिवाराकडून ग्रंथ ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

## १३ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २६ पांगरी येथे ग्रंथ ज्ञानेश्वरी वितरण व सन्मान सत्कार

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेडपासून जवळच असलेल्या पांगरी येथे आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्थेच्यावतीने गेल्या ९ वर्षांपासून घर तिथे ज्ञानेश्वरी, घरोघरी ज्ञानेश्वरी, हा उपक्रम नांदेडसह संपूर्ण महाराष्ट्रभर राबविण्यात येत आहे.

दरवर्षी श्रावण शुद्ध प्रतिपदा ते भाद्रपद षष्ठी या कालावधीमध्ये आपापल्या घरीच साधकांनी आपल्या सोयीच्या वेळेनुसार दि. १३ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर २०२६ दिलेल्या वेळा पत्रकाप्रमाणे पारायण करण्याचा नेम गेल्या नऊ वर्षापासून आम्ही वारकरी परिवाराच्या माध्यमातून सुरू आहे. यापूर्वी साधकांना १०,५०० ग्रंथ वितरित करण्यात आले होते. यावर्षी त्यामध्ये भर पडली असून, यंदा महाराष्ट्रातील परभणी, हिंगोली, लातूर, पुणे, नाशिक, ठाणे, मुंबई, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये एकूण १७०० ग्रंथ संस्थेचे संस्थापक/अध्यक्ष हभप राम महाराज पांगरेकर यांच्या निवासस्थानी पांगरी ता.जि. नांदेड येथे वितरण करण्यात आले.

जगन्नाथराव चक्रवार नांदेड जिल्हा उपाध्यक्ष यांच्याकडून ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या १००० पारायण प्रती भेट देण्यात आल्या. तसेच संस्थेच्या वतीने अनेक मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संस्थेचे सचिव व्यंकटराव महाराज माळकौठेकर, सहसचिव प्रभाकर महाराज, सल्लागार शिवाजीराव पांगरेकर, राज्य प्रसिद्धी प्रमुख चंपतराव डाकोरे, संस्थापक सदस्य प्रवीण महाराज पार्डीकर, भगवान राहाटीकर, त्रिमुख एडके, नांदेड जिल्हाध्यक्ष पंढरीनाथ महाराज मुरकुटे, परभणी जिल्हाध्यक्ष आकाश महाराज खोकले, संभाजीनगर जिल्हाध्यक्ष उत्तमराव मल्हारे, लातूर जिल्हा संपर्कप्रमुख गोविंद माऊली इबीतदार, नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख दिनाजी सांगळे, प्रसिद्धीप्रमुख ओमप्रकाश ढाले, मारोती वडजे, माधवराव बोईनवाड, नागोराव मेंडेवाड, विवेकानंद कसरे, प्रभाकर पवळे, बाळू धुमाळ, राजू गागलेगाव, उत्तमराव टाक, सौ. कुसुमताई शिंदे, गणेश पवार, मनोहर येरपूरवाड, सोपान गिरे, बालाजी शिंदे, गौरव कोडगिरे, संजय ढाले, सतीश चितळकर यांच्यासह नांदेड जिल्ह्यातील व महाराष्ट्रातील अनेक वारकरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन गंगाराम पांगरेकर यांनी केले होते.

# चंदेरी

# मुलाला सैन्यात जायचे असेल तर आनंदच होईल!

## अभिनेता जिमी शेरगिलची विशेष मुलाखत

**अभिनेता जिमी शेरगिल सध्या त्याच्या आगामी 'ऑपरेशन सफेद सागर' या मालिकेमुळे चर्चेत आहेत. कारगिल युद्धातील नायक विंग कमांडर बी. एस. धनोआ यांची भूमिका ते या मालिकेत साकारत आहेत. देशाच्या जवानांचे शौर्य आणि त्यागाच्या कथा नव्या पिढीपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक असल्याचे जिमी शेरगिल यांनी सांगितले. विशेष म्हणजे, त्यांचा मुलगा वीर याला भविष्यात सैन्यात दाखल व्हायचे असल्यास आपण त्याला नक्कीच प्रोत्साहन देऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले.**



जिमी शेरगिल यांनी सांगितले, की 'ऑपरेशन सफेद सागर' ही देशाच्या जवानांच्या शौर्याची सत्यकथा आहे. ही कथा पिढ्यान्‌पिढ्या पुढे जाणे अत्यंत आवश्यक आहे. आपण या कथा पुढे नेल्या नाहीत, तर एका टप्प्यावर हे शौर्य आणि त्याग विस्मरणात जाऊ शकतो. हवाई दल, लष्कर किंवा नौदलातील जवान ज्या प्रकारचे शौर्य दाखवतात, त्यांच्या पराक्रमाच्या कथा नव्या पिढीपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्यांच्या मते, अशा कथा ऐकल्यामुळे तरुणांमध्ये देशाबद्दल आणि जवानांबद्दल अभिमानाची भावना निर्माण होते. त्याचबरोबर सैन्यदलाला करिअरचा पर्याय म्हणून निवडण्याची प्रेरणाही तरुणांना मिळू शकते.

### '90 टक्के गुण मिळूनही निवड होऊ शकली नाही...'

जिमी शेरगिल यांनी आपल्या तरुणपणी सैन्यात जाण्याचे स्वप्न पाहिले होते. त्या आठवणी सांगताना ते म्हणाले, की "आम्ही शाळेत असताना जवळपास प्रत्येक विद्यार्थी सैन्यात जाण्याचा प्रयत्न करायचा. मात्र त्यासाठीची पात्रता आणि निवडीची पातळी खूपच कठीण होती. माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना ९० टक्के गुण मिळूनही ती पात्रता पार करता आली नाही. त्यामुळे माझे सैन्यात जाण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले." ते पुढे म्हणाले, "पण एखाद्या व्यक्तीमध्ये सैन्यात जाण्याची तीव्र इच्छा, जिद्द आणि क्षमता असेल आणि तो सर्व निकषांमध्ये पात्र ठरत असेल, तर त्याने सशस्त्र दलांना निश्चितच पहिली पसंती दिली पाहिजे. तिथले जीवन इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा वेगळे आहे." जिमी यांनी सांगितले की, २००१ पासून त्यांना हवाई तळ आणि लष्करी परिसरात जाऊन काम करण्याची संधी मिळत आहे. "तिथले वातावरण, शिस्त आणि मनाला मिळणारे समाधान विलक्षण आहे. तिथे गेल्यावर एका वेगळ्याच जगाचा अनुभव येतो," असे ते म्हणाले.

### 'वास्तविक जीवनातील नायक अतिशय साधे'

'ऑपरेशन सफेद सागर'मध्ये विंग कमांडर बी. एस. धनोआ यांची भूमिका साकारताना आलेल्या अनुभवाबद्दल जिमी म्हणाले, "वास्तविक जीवनातील नायक मुळात अतिशय सामान्य आणि साधे लोक असतात. ते जमिनीशी जोडलेले आणि अत्यंत नम्र असतात. मात्र ते जे कार्य करतात, ते खऱ्या अर्थाने वीरतेचे असते." हीच साधेपणाची आणि नम्रतेची भावना आपल्या भूमिकेत कायम ठेवण्याचा प्रयत्न केल्याचेही त्यांनी सांगितले.



### 'आपण आपसातील भांडणे थांबवली पाहिजेत'

देशासाठी स्वतः काही करण्याची इच्छा आहे का, असा प्रश्न विचारण्यात आला असता जिमी शेरगिल यांनी देशातील एकतेवर भर दिला. "मी एवढेच म्हणेन की आपण आपसातील भांडणे थांबवली पाहिजेत. आपण हळूहळू एकमेकांपासून दुरावत आणि विभागले जात आहोत. असे होऊ नये. कारण आपण विभागलो गेलो, तर बाहेरील शक्ती त्याचा फायदा घेऊ शकतात. त्यामुळे आपण सर्वांनी एकजुटीने राहणे हीच आपली सर्वांत मोठी ताकद आणि विजय असेल," असे त्यांनी सांगितले. जिमी शेरगिल यांना विचारण्यात आले की, ते तरुणांना सैन्यदलाला करिअर म्हणून निवडण्याचा सल्ला देतात, तर आपल्या मुलगा वीरलाही तेच सांगतील का? यावर जिमी म्हणाले, "वीर पात्र ठरत असेल तर नक्कीच. मी त्याला कधीच रोखणार नाही. मी नेहमीच म्हटले आहे की माझ्या मुलांना आयुष्यात जे काही करायचे असेल, त्यासाठी मी त्यांना कधीही अडवणार नाही. त्यांना क्रीडा क्षेत्रात जायचे असेल तर त्यांनी तिथे जावे. त्याचप्रमाणे, सशस्त्र दलात जाण्याची त्यांच्यात क्षमता आणि बुद्धिमत्ता असेल, तर त्यांनी नक्कीच सैन्यात जावे." जिमी शेरगिल यांच्या या वक्तव्यातून मुलांच्या करिअरबाबत त्यांची भूमिका स्पष्ट होते. मुलांनी स्वतःच्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार क्षेत्र निवडावे आणि त्या निर्णयाला आपण पूर्ण पाठिंबा देऊ, असे त्यांनी स्पष्ट केले.



## अभिनेत्री खुशाली कुमार हिची विशेष मुलाखत

# फॅशन डिझायनर म्हणून आनंदी नव्हते, अभिनय क्षेत्रात आल्याने स्वप्न पूर्ण!

**दिवंगत संगीतकार आणि निर्माते गुलशन कुमार यांची कन्या अभिनेत्री खुशाली कुमार सध्या तिच्या आगामी 'दुल्हनिया ले आएगी' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. गुलशन कुमार यांच्या तीनही मुलांनी आपापल्या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. भूषण कुमार चित्रपट निर्मिती क्षेत्रात, तुलसी कुमार गायन क्षेत्रात, तर खुशाली कुमार अभिनय क्षेत्रात सक्रिय आहे. एका विशेष मुलाखतीत खुशालीने वडिलांचा वारसा, अभिनय क्षेत्रात उशिरा केलेला प्रवेश, आईची भूमिका, स्वतःचे फॅशन डिझायनिंगचे करिअर आणि लग्नासाठी जोडीदार निवडण्याच्या निकषांबद्दल मनमोकळेपणाने सांगितले.**

खुशाली म्हणाली, की "मला माझ्या वडिलांची, गुलशन कुमार यांची मुलगी असल्याचा खूप अभिमान आहे. लोक मला 'गुलशनजींची मुलगी' म्हणतात, तेव्हा मला खूप आनंद होतो. आम्ही तिन्ही भावंडेही आमच्या वडिलांच्या नावामुळे ओळखले जावे, अशीच आमची इच्छा आहे." वडिलांनी संगीत क्षेत्रासह धर्म आणि समाजासाठीही मोठे योगदान दिल्याचे सांगत ती म्हणाली, "माझी इच्छा आहे की पुढच्या पिढ्यांनी माझ्या वडिलांचे नाव कायम लक्षात ठेवावे. त्यांनी संगीत सामान्य माणसापर्यंत पोहोचवले. त्यामुळे प्रत्येकाने त्यांचे योगदान लक्षात ठेवावे, असे मला वाटते." आपल्या अभिनय प्रवासाबद्दलही खुशालीने समाधान व्यक्त केले. "अभिनेत्री म्हणून माझा प्रवास खूप सुंदरपणे पुढे जात आहे. लोक माझा प्रवास 'धोखा : राउंड द कॉर्नर' या पहिल्या चित्रपटापासून पाहतात. मात्र मी माझा प्रवास त्या काळापासून पाहते, जेव्हा एका छोट्या मुलीने अभिनेत्री होण्याचे स्वप्न पाहिले होते. आज मी चित्रपटांमध्ये काम करत आहे, ही माझ्यासाठी खूप विशेष गोष्ट आहे. माझ्या या प्रवासामुळे मी खूप आनंदी आणि अभिमानी आहे," असे ती म्हणाली.



### 'आईला भीती वाटायची...'

खुशालीने अभिनय क्षेत्रात प्रवेश करण्यास उशीर का झाला, याचे कारणही सांगितले. "तुम्हाला अभिनेत्री व्हायचे आहे, असे जेव्हा तुम्ही कुटुंबाला सांगता, तेव्हा लगेच पाठिंबा मिळतोच असे नाही. माझे वडील खूप पाठिंबा देणारे होते. ते अतिशय खंबीर स्वभावाचे होते. मात्र माझी आई अनेक बाबतींत थोडी पारंपरिक विचारांची होती," असे ती म्हणाली. वडिलांच्या निधनानंतर आईची चिंता अधिक वाढल्याचेही खुशालीने सांगितले. "वडिलांच्या निधनानंतर आम्हाला सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने आईचा दृष्टिकोन आणखी सावध झाला. मुंबईसारख्या शहरात मी एकटी होते आणि तिची तीन मुले होती. कॅमेऱ्यासमोर येण्यासारखे काही करू नये, असे तिला वाटायचे. त्यामुळे फॅशन डिझायनिंग हा माझ्यासाठी अधिक सुरक्षित पर्याय असल्याचे तिला वाटले," असे खुशालीने सांगितले.

### '...पण मी आनंदी नव्हते'

फॅशन डिझायनिंगमध्येही आपली आवड होती, असे खुशालीने सांगितले. "लहानपणापासूनच मला आईच्या साड्या कापून त्यापासून वेगवेगळे कपडे तयार करण्याची आवड होती. त्यामुळे या क्षेत्रात मी चांगले काम करू शकेन, असे आईला वाटले. मी फॅशन डिझायनिंग केले आणि त्यात बऱ्यापैकी यशही मिळवले." ती म्हणाली, की "आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक दुकानांमध्ये माझ्या नावाने तयार केलेले कपडे विकले जात होते. परदेशात जवळपास ३० ते ४० दुकानांमध्ये माझ्या कपड्यांची विक्री होत होती. मात्र मी कधीच आनंदी नव्हते. माझा खरा आनंद नेहमीच कॅमेऱ्यासमोर होता."

### 'भूषण तेव्हा केवळ 18 वर्षांचा होता'

वडिलांच्या निधनानंतर कुटुंबासमोर आलेल्या जबाबदाऱ्यांबद्दल बोलताना खुशाली भावुक झाली. "जेव्हा आम्ही वडिलांना गमावले, तेव्हा माझा भाऊ भूषण खूपच लहान होता. तो अवघा १८ वर्षांचा होता. एवढ्या मोठ्या साम्राज्याची जबाबदारी सांभाळणे त्याच्यासाठी सोपे नव्हते. त्यामुळे त्या काळात आम्हा तिन्ही भावंडांचा प्रयत्न एकमेकांना आधार देण्याचा होता," असे ती म्हणाली. "आईवर कोणत्याही प्रकारचा अतिरिक्त ताण येऊ नये, याचीही आम्ही काळजी घेत होतो. त्यामुळे आईला अभिनयासाठी तयार करण्यासाठी मला थोडा वेळ लागला. मात्र काळ जसजसा पुढे गेला आणि आईने कंपनीत काम करण्यास सुरुवात केली, तसतसा तिचा आत्मविश्वास वाढत गेला. आता तर आई स्वतः म्हणते की, 'माझी मुलगी हॉलिवूड चित्रपटातही काम करेल,'" असे खुशालीने सांगितले.

### 'योग्य वर शोधणे आज खूप कठीण आहे'

'दुल्हनिया ले आएगी' या चित्रपटात खुशालीने ५० हून अधिक वरांना नकार दिल्याचे दाखवण्यात आले आहे. याबद्दल विचारले असता ती म्हणाली, की "आजच्या काळात योग्य वर मिळणे सोपे नाही. त्याचा शोध घेणे खूप कठीण झाले आहे. आजकाल मुलींच्या अपेक्षांची यादीही वाढत चालली आहे. मात्र माझे मत असे आहे की, तुमच्या अपेक्षांनुसार योग्य व्यक्ती मिळाली आणि तुमची यादी पूर्ण झाली, तर मग विलंब न करता लग्नाचा निर्णय घ्यायला हरकत नाही."

### 'जोडीदारासोबत खास नाते असणे सर्वांत महत्त्वाचे'

आपल्या भावी जोडीदारामध्ये कोणते गुण असावेत, याबद्दल खुशालीने सांगितले, की "माझ्यासाठी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे एकमेकांमधील जुळवून घेण्याची भावना आणि मानसिक नाते. ते नाते निर्माण झाले तर समोरच्या व्यक्तीमधील उणिवाही जाणवत नाहीत." ती पुढे म्हणाली, की "हे नाते असे असते की, आपल्याला समोरच्या व्यक्तीला आपण अनेक वर्षांपासून ओळखतोय, असे वाटते. जसे आपण आई-वडील किंवा भाऊ-बहीणींसोबत राहताना सहज आणि सुरक्षित वाटते, अगदी तसाच आरामदायीपणा जोडीदारासोबत जाणवणे आवश्यक आहे. तेव्हाच एखादी मुलगी आपले कुटुंब सोडून त्या व्यक्तीसोबत आयुष्य घालवण्याचा निर्णय घेऊ शकते."

# थलपती विजय अन् संगीता यांचा घटस्फोट टळला?

## पत्नीने मागे घेतली घटस्फोटाची याचिका

**अभिनेता आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय अर्थात थलपती विजय यांच्या वैवाहिक आयुष्याबाबत चर्चेत असलेल्या घटस्फोटाच्या प्रकरणाला नवे वळण मिळाले आहे. विजय यांच्या पत्नी संगीता सोरलिंगम यांनी घटस्फोटाची याचिका मागे घेतली आहे. त्यामुळे न्यायालयाने हे प्रकरण निकाली काढले आहे. तमिळनाडूतील चेंगलपट्टू जिल्हा न्यायालयात दाखल करण्यात आलेली ही याचिका संगीता यांनी पुढे न नेण्याचा निर्णय घेतला. त्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजेरी लावून घटस्फोटाचे प्रकरण पुढे चालवायचे नसल्याचे स्पष्ट केले.**



न्यायालयातील अधिकृत सूत्रांनी सांगितले की, संगीता यांच्या विनंतीनंतर न्यायालयाने त्यांची याचिका मागे घेण्यास मंजुरी दिली आणि प्रकरणाचा निपटारा केला. न्यायालयाच्या आदेशानुसार, संगीता यांनी कौटुंबिक न्यायालयात याचिका मागे घेण्याचा अर्ज दाखल केला होता. त्यानंतर व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे त्यांचा जबाब नोंदवण्यात आला. आपण हे प्रकरण यापुढे चालवू इच्छित नसल्याचे त्यांनी न्यायालयाला सांगितले. याप्रकरणातील प्रतिवादीच्या वकिलांना याचिका मागे घेण्याबाबत नोटीस देण्यात आली होती. त्यांनी याचिका मागे घेण्यास कोणताही आक्षेप नसल्याचे न्यायालयाला सांगितले. त्यानंतर न्यायालयाने प्रकरण निकाली काढले. संगीता यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये घटस्फोटाची याचिका दाखल केली होती. या याचिकेत त्यांनी विजय यांच्यावर विवाहबाह्य संबंध आणि मानसिक त्रासाचे आरोप केल्याचे वृत्त समोर आले होते. संगीता यांच्या दाव्यानुसार, विजय यांचे एका अभिनेत्रीशी संबंध असल्याची माहिती त्यांना २०२१ मध्ये मिळाली होती. विजय यांनी हे संबंध संपवण्याचे आश्वासन दिल्यानंतरही ते सुरूच ठेवले, असा आरोप त्यांनी केला होता. संगीता यांनी असा दावाही केला होता की, विजय संबंधित अभिनेत्रीबरोबर सार्वजनिक ठिकाणी तसेच परदेश दौऱ्यांवर जात असल्याचे त्यांनी पाहिले होते. घटस्फोटाचे प्रकरण न्यायालयात सुरू असताना चेन्नईतील विजय यांच्या घरात राहण्याची परवानगी मिळावी, अशी मागणीही संगीता यांनी केली होती. आपण ब्रिटिश नागरिक असून भारतात राहण्यासाठी आपल्याकडे दुसरे घर नाही, असा दावा त्यांनी न्यायालयात केला होता. त्यामुळे घटस्फोटाचे प्रकरण सुरू असेपर्यंत विजय यांच्या चेन्नईतील घरात राहण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती त्यांनी केली होती. संगीता यांनी घटस्फोटाची याचिका मागे घेतल्यामुळे विजय आणि संगीता यांचा घटस्फोट होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, दोघांमधील वैवाहिक वाद नेमका कशामुळे मिटला किंवा त्यांच्यात कोणता समझोता झाला, याबाबत अधिकृतपणे कोणतीही माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे याचिका मागे घेण्यामागील नेमके कारण काय, याबाबत सध्या केवळ अंदाज व्यक्त केले जात आहेत.

# 'भारत भाग्य विधाता' आता ओटीटीवर; कंगना रनौतचा देशभक्तीपर चित्रपट 15 ऑगस्टपासून पाहता येणार

**कंगना रनौत अभिनित 'भारत भाग्य विधाता' हा चित्रपट चित्रपटगृहांमध्ये अपेक्षित यश मिळवू शकला नसला, तरी आता तो ओटीटीवर प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. मनोज तापडिया यांनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आधारित आहे. चित्रपटाला समीक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला होता; मात्र बॉक्स ऑफिसवर त्याची कामगिरी समाधानकारक राहिली नाही.**

'भारत भाग्य विधाता' हा चित्रपट १५ ऑगस्टपासून झी५वर पाहता येणार आहे. ओटीटी मंचाने शुक्रवारी चित्रपटाचा नवा ट्रेलर प्रदर्शित करत याबाबत माहिती दिली. '२६/११ च्या काळोख्या रात्री असामान्य धैर्य दाखविणाऱ्या सामान्य परिचारिकांची ही कधीही न सांगितलेली कथा आहे. काही नायक कधीच समोर आले नाहीत आणि त्यांच्या कथा कधी सांगितल्याही गेल्या नाहीत. आता मात्र त्या जगासमोर येणार आहेत,' अशा आशयाचे निवेदन झी५ने ट्रेलरसह प्रसिद्ध केले आहे. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने हा चित्रपट ओटीटीवर प्रदर्शित होत असल्याने त्याचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. कंगना रनौतने या चित्रपटाबाबत बोलताना सांगितले की, काही कथा आपल्याला स्वतःहून निवडतात, कारण त्या सांगितल्या जाणे आवश्यक असते. 'भारत भाग्य विधाता' हीदेखील अशीच एक कथा आहे. अभिनेत्री आणि निर्माती अशा दोन्ही भूमिका पार पाडताना २६/११ च्या हल्ल्यादरम्यान दहशतवाद आणि माणुसकी यांच्यामध्ये ठामपणे उभे राहिलेल्या आरोग्यसेवा कर्मचाऱ्यांच्या न सांगितलेल्या कथा समोर आणणे आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे होते, असे कंगनाने म्हटले. त्यांच्या धैर्यामागे प्रसिद्धी किंवा कौतुकाची अपेक्षा नव्हती, तर कर्तव्य आणि माणुसकीची भावना होती. स्वातंत्र्यदिनाच्या आसपास हा चित्रपट प्रदर्शित होणे त्याच्या संदेशाला अधिक अर्थपूर्ण बनवते, असेही कंगनाने



सांगितले. 'भारत भाग्य विधाता'ची कथा २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यावर आधारित आहे. या हल्ल्याच्या काळात असंख्य नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी धैर्याने काम करणाऱ्या अनामिक नायकांवर चित्रपट प्रकाश टाकतो. मुंबईतील कामा आणि आल्ब्लेस रुग्णालयाच्या पार्श्वभूमीवर ही कथा उलगडते.

## Change In Name

My old name is **Arjumand Mohammed Fayyaz Siddiqui** which now I am changing as new name **Arjumand Mohammed Ambiya Khan** hence forth my all correspondence will be done as per my new name. Please consider the same.

**Address - Arjumand Mohammed Ambiya Khan Sugra Manzil, Plot No. 12,Galli No.16, Millat Nagar Near Water Tank-Nanded, Tq & Dist. Nanded. Pin Code:431604 Mo. No. 9209609787**

## Change In Name

My old Name is **CHAND SAHAB** which now I am Changing as New Name **CHAND KHAN** Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same,

Sign by - CHAND KHAN

Address: 7-2-11, Itwara, Ghoda Galli, Itwara, Nanded,-431605 Mob 7276561172

## Change In Name

My old Name is **ALANE ASHUTOSH GAUTAM** which now I am Changing as New Name **ASHUTOSH ALANE.** Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same.

**Sign by - ASHUTOSH ALANE**
**Address : 1010 SAPTAGIRI COLONY TARODA BU TARODA BK, NANDED-431605 Mob 9881669385**

## Change In Name

My old Name is **ASLAM QUADRI** which now I am Changing as New Name **ASLAM QUADRI KHALIL ULLAH QUADRI.** Hence forth My All Correspondence will be done as Per my new name. Please consider the same,

**Sign by - ASLAM QUADRI KHALIL ULLAH QUADRI**
**Address: H.NO 1-13-75 LANE NO 3 PEER BURHAN NAGAR NANDED - 431605 Mob 9970693993**

## Change In Name

MY OLD NAME IS **JITENDRA SINGH MOTORAWALE.** NOW I AM CHANGING AS A NEW NAME **JITENDRA SINGH MOTARWALE** HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE KINDLY CONSIDER THE SAME.

**FULL ADDRESS. H.NO.3-6-190, GURUDWARA GATE NO 3, BADPURA NANDED MS 431601. MOB.NO.9423135570**

## Change In Name

MY OLD NAME IS **AMRINDER SINGH MOTORAWALE.** NOW I AM CHANGING AS A NEW NAME **AMRINDER SINGH MOTARWALE.** HEANCE FORTH MY ALL CORRESPONDENCE WILL BE DONE AS PER MY NEW NAME. PLEASE KINDLY CONSIDER THE SAME.

**FULL ADDRESS. H.NO 3-6-190, GURUDWARA GATE NO 3, BADPURA NANDED MS 431601.**

## Change In Name

My Old Name is **MOHAMMED AFROJ ISAMINYA** Which Now I Am Changing As New Name **AFROJ ISA SHAIKH** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

My Old Name is **MOHAMAD MOHASIN BEGUM MOHAMAD ISA** Which Now I Am Changing As New Name **MOHSINABEGUM ISA SHAIKH.** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

MY OLD NAME IS **RESHAMA KOUR MOTORAWALE.** Now I am Changing as a new Name **RESHAM KAUR MOTARWALE.** Heance Forth My All Correspondence will be done as per my New Name. Please kindly consider the same.

**FULL ADDRESS- H.NO.3-6-190, GURUDWARA GATE NO 3, BADPURA NANDED MS 431601. MOB.NO.9423135570.**

## Change In Name

My Old Name is **NIKHAT SULTANA** Which Now I Am Changing As New Name **NIKHAT BEGUM MUSHTAQUE AHMED** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :-**
Navghat karbala road, holi, itwara nanded 431604

## Change In Name

My Old Name is **ISAMINYA ABDUL KHADARSAB** Which Now I Am Changing As New Name **ISA ABDULKHADAR SHAIKH** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709**

## Change In Name

My Old Name is **SHAHANA PARVEEN** Which Now I Am Changing As New Name **SHAHEEN BEGUM JAHANGIR KHAN** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- H. NO. 09-06-797 Roshan Manzil, Khusro Nagar, Degloor Naka, Nanded M. No. : 9307696944**

## जाहिरात

नोबल एज्युकेशन सोसायटी, लेबर कॉलनी, नांदेड अल्पसंख्याक दर्जा प्राप्त संचलित

# नोबल हायस्कूल, लेबर कॉलनी, नांदेड

या शाळेत एका शिक्षण सेवकाचे पद खालील प्रमाणे पद भरणे आहे.

| अ. क्र. | पद | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता | जात | वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण सेवक | १ | एच.एस.सी.डी.एड्. टी.ई.टी/ सी.टी.ई.टी I | खुला | ६ वेळ | १००% अनुदानित |

गरजू उमेदवारांनी दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता मूळ कागदपत्रासह व एक झेरॉक्स प्रत घेवून नोबल हायस्कूल, लेबर कॉलनी नांदेड येथे उपस्थित रहावे. प्रवास भत्ता व इतर भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

टीप : मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नांदेड यांच्या परवानगीने प्रकाशित करण्यात येते.

स्वा/-
मुख्याध्यापक
नोबल हायस्कूल, नांदेड २

## तक्षशिला मागासवर्गीय मालकी हक्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सांगवी(बु.), ता.जि.नांदेड

नोंदणी क्र. एनएनडी/एनएनडी/एचएसजी/टीओ/435/1995, दिनांक: 02/06/1995

दिनांक: 08/08/2026

### विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस
(फक्त सभासंदाकरीता)

तक्षशिला मागासवर्गीय मालकी हक्क सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.सांगवी(बु.), ता.जि. नांदेड या संस्थेच्या सर्व सन्माननिय प्लॉटधारक सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या गृहनिर्माण संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा संस्थेचे प्रशासक श्री. बी. बी. बोधगीरे, सहकार अधिकारी श्रेणी 1 संलग्न उपनिबंधक, सहकारी संस्था, ता.नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक: 16/08/2026 रोजी दुपारी ठीक 01.00 वाजता संस्थेचा ओपन स्पेस, गट नं.72 येथे खालील विषयावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा आयोजीत करण्यात आलेली आहे. तरी संस्थेच्या सन्माननीय सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

सभेपुढील विषय:

1) संस्थेचे चेअरमन/ सचिव यांच्याकडुन संस्थेचे न मिळाल्यामुळे संपुर्ण रेकॉर्ड लेखापरीक्षण अहवाल दि.31/03/2024 च्या आधारे नवीन रेकॉर्ड तयार करण्यास मान्यता देणे बाबत.
2) संस्थेच्या सभासदांकडे त्यांच्या प्लॉट संदर्भातील आवश्यक सर्व कागदपत्रांची झेरॉक्स प्रत प्रशासक यांच्याकडे जमा करणे बाबत.

प्रशासक
तक्षशिला मागासवर्गीय मालकी हक्क सहकारी गृहनिर्माण संस्था
मर्या.सांगवी(बु.), ता.जि.नांदेड

(नोट :- कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास तिच सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल नंतर सभेला कोरमची आवश्यकता असणार नाही.)

## Change In Name

My Old Name is **SALEENA ANJUM JUMMA KHAN** Which Now I Am Changing As New Name **SALINA ANJUM ARBAZ KHAN** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address :- 1-21-1097, Farookh Nagar, Near Saleem Kirana, Hingoli Naka, Taroda Bk. Nanded Maharashtra 431605 Mo. No. +91 97674 56370**

## Change In Name

My Old Name is **SAGAR GANESHRAO MAHAJAN** Which Now I Am Changing As New Name **SAGAR GANESH MAHAJAN** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Address - R/o. H.No. 2 12 2 Near Tarodekar Market, Mahajan Complex, Vazirabad, Nanded 431601**

## Change In Name

My Old Name is **MOHAMAD FEROJ** which now I am changing as New Name **FEROJ ISA SHAIKH.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address -** H.No. 1926, Vasant Nagar, At.Po. Naigaon, Tq. Naigaon (Kh.) Dist. Nanded 431709

## Change In Name

My Old Name is **AKHTARI BEGUM** Which Now I Am Changing As New Name **AKHTARI BEGUM SHAIKH ABDUL MASTAN** Henceforth My All Correspondence. Will Be Done As My New Name Plese Consider The Same

**Contact - Shaikh Abdul Mastan, 972 RAILWAY STATION KARKHELI, KARKHELI TQ DHARBAD, NANDED, MAHARASHTRA-431808 Mob.: 9767973959**

## जाहीर प्रगटन

तहसिलदार उमरी तथा तालुका दंडाधिकारी उमरी यांचे न्यायालयात
इ.कि.फौ.अर्ज क्र./2026

श्री / श्रीमती चंद्रमणी गंगाधर तळेगांवकर
विरुध्द
ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय तळेगांव ता.उमरी जि.नांदेड
प्रकरण - जन्म / मृत्यू (जन्म) नोंद घेणे बाबत.

ज्या अर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार नामे चंद्रमणी तळेगांवकर, तळेगांव ता.उमरी जि.नांदेड यांनी कार्यालयात हजर राहुन जन्म / मृत्यू नोंदणी कायदा 2023 व सुधारीत शासन निर्णय दिनांक 12 मार्च, 2025 अन्वये दिनांक 17/06/2012 रोजी नोंद घेण्यास इ.कि.फौ.अर्ज दि.04/07/2026 रोजी दाखल केला आहे.

अर्जदार यांचा मुलगा / मुलगी / स्वत: नामे समिक्षा चंद्रमणी तळेगांवकर यांचा जन्म / मृत्यू दिनांक 17/06/2012 रोजी झाल्याची नोंद मौजे तळेगाव ता.उमरी जि.नांदेड येथे उपलब्ध नाही.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस व संबंधीतास कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्माची / मृत्यूची नोंद घेण्यासाठी कोणाचा काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी लेखी आक्षेप या कार्यालयास सदर जाहीर प्रगटनापासून 15 दिवसाच्या आत सादर करावा, नंतर प्राप्त होणाऱ्या आक्षेपाचा विचार केल्या जाणार नाही. 15 दिवसात आक्षेप प्राप्त न झाल्यास सदरच्या अर्जावर एकतर्फी आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक : 19/07/2026
स्थळ : उमरी

तहसिलदार,उमरी

## जाहिरात

संस्थेचे नांव :- मराठवाडा शिक्षण संस्था, नांदेड
संस्था कोड :- 271517SC038

मराठवाडा शिक्षण संस्था . नांदेड या व्यवस्थापनाच्या राजर्षी शाहू व ज्यु.कॉलेज वसंतनगर, नांदेड या 100% अनुदानीत शाळेमध्ये शासनाने शिक्षक भरतीसाठी प्राधान्यक्रम दिलेल्या पवित्र पोर्टल प्रणाली 2025 मार्फत शिक्षण सेवक भरती करण्यासाठी जाहीरात देत आहोत. खालील नमुद केलेल्या पदांसाठी आवश्यक शै.व व्यवसायीक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र पोर्टल प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवीण्यात येत आहे. पात्र उमेदवारांनी शासनाच्या https:tait2025.mahateacherrecruitment.org.in या पवित्र पोर्टल च्या संकेत स्थळास भेट द्यावी.

| अ.क्रं | वर्ग | पद | विषय | शै.पात्रता | शिकवीण्याचे माध्यम | मानधन | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 ते 5 | शिक्षण सेवक | सर्व विषय | H.S.C , D.Ed | मराठी | 16000/- | 1 |
| 2 | 6 ते 8 | शिक्षण सेवक | मराठी | B.A., B.Ed | मराठी | 16000/- | 1 |
| 3 | 6 ते 8 | शिक्षण सेवक | विज्ञान | B.Sc., D.Ed | सेमी इंग्रजी | 16000/- | 1 |
| 4 | 6 ते 8 | शिक्षण सेवक | गणित / विज्ञान | B.Sc., D.Ed | सेमी इंग्रजी | 16000/- | 1 |
| 5 | 6 ते 8 | शिक्षण सेवक | इंग्रजी | B.A., B.Ed | इंग्रजी | 16000/- | 1 |
| 6 | 9 ते 10 | शिक्षण सेवक | शारिरीक शिक्षण | B.A / B.sc B.P.Ed | मराठी | 18000/- | 2 |
| 7 | 9 ते 10 | शिक्षण सेवक | विज्ञान | B.Sc., B.Ed | सेमी इंग्रजी | 18000/- | 1 |
| 8 | 9 ते 10 | शिक्षण सेवक | हिंदी | B.A., B.Ed | मराठी | 18000/- | 1 |

वरील सर्व पदाचे आरक्षण अनुसूचित जाती 02 वि.जा.अ 01 भ.ज.क 01 इ.मा.व 01 वि.मा.प्र. 01 इ.डब्लू.एस 01 एस.ई.बी.सी. 01 खुला 01 (दोन पद महिलांसाठी राखीव आहेत.)

टिप :- वरील रिक्त पदासाठी पवित्र प्रणालीमार्फत शासनाकडून उमेदवारांची नावे कळविली जाणार आहेत, त्यामुळे प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही अर्ज करू नये.

स्वाक्षरी
अध्यक्ष
मराठवाडा शिक्षण संस्था वसंतनगर, नांदेड

स्वाक्षरी
सचिव
मराठवाडा शिक्षण संस्था वसंतनगर, नांदेड

## जाहिर प्रगटन

माझे पक्षकार **श्री. बालाजी पि. शंकरराव सनपुरकर** रा. लोहा ता. लोहा जि. नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन व पुरविलेल्या कागदपत्रावरुन मी खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

हे की, माझ्या पक्षकारांनी मा. न्यायालय लोहा येथे नियमिमत दिवाणी दावा क्र. १६६/२०२५ हा मदन पि. शंकरराव सनपुरकर व ईतर यांच्या विरुध्द वडिलोपार्जित मालमत्तेत वाटणी मिळण्यासाठी दाखल केला आहे तो प्रलंबित आहे.

हे की, असे असतांना प्रस्तुतच्या दाव्यामध्ये समाविष्ट मालमत्ता शेत गट क्र. ३४७ क्षेत्र १ हे. ७३ आर स्थित बेरळी ता. लोहा जि. नांदेड ही ईतर कोणास मदन शंकरराव सनपुरकर हे सदर मालमत्ता ही फक्त त्यांच्या नावावर असण्याचा गैरफायदा घेऊन विक्री करण्याच्या इराद्याने खरेदीदारांना दाखवत आहेत असे माझ्या पक्षकारास खात्रीलायकरित्या समजले आहे.

तरी सर्व संबंधितांना या जाहीर प्रगटनाव्दारे संबंधितांना सुचित करण्यात येते की, वर नमूद मालमत्ते संदर्भात कोणीही कसल्याही प्रकारचा व्यवहार माझ्या पक्षकाराच्या अपरोक्ष मदन शंकरराव सनपुरकर यांचया सोबत करु नये अन्यथा माझे पक्षकार संबंधितांविरुध्द दिवाणी व फौजदारी स्वरुपाच्या कारवाय दाखल करतील त्याच्या होणाऱ्या परिणामास संबंधित जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत,
अे.के. वाघमारे
वंकिल, नांदेड
मो.क्र. ७५५७९३९३५८

जाहीर प्रगटन देणार
बालाजी शंकरराव सनपुरकर
रा. लोहा ता. लोहा जि. नांदेड


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७७१९७१, ९८६०७२१३५६


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# विद्युतनगरमधील लोटस 'स्पा'वर पोलिसांची धाड

## अनैतिक मानवी व्यापाराचा भांडाफोड
## चार महिलांची सुटका तर एकास अटक



**नांदेड (प्रतिनिधी)** – स्थानिक गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने दि. ७ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजता विद्युतनगर चौक, आनंदनगर रोड येथील लोटस स्पा सेंटरवर छापा टाकला. यावेळी पोलिसांनी चार वेश्या व्यवसाय करण्यासाठी आलेल्या महिलांची सुटका करत एकाला अटक केली आहे.

स्पा मसाज सेंटरच्या नावाखाली अवैध वेश्या व्यवसाय सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर बोगस ग्राहक आणि पंचांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. बोगस ग्राहकाला पंचांसमक्ष ५०० च्या ८ नोटा एकूण ४ हजार देण्यात आले होते. छाप्यात स्पा सेंटरमध्ये अवैध व्यवसाय सुरू असल्याचे आढळून आले. यावेळी ४ पीडित महिलांची सुटका करण्यात आली. त्यात महाराष्ट्रासह आसाम राज्यातील महिलांचा समावेश आहे. यावेळी गौरव राजकुमार सरपाते, वय २० वर्षे, रा. राहुलनगर, हनुमानगड नांदेड याला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने हा व्यवसाय चालवत असून, पवितसंघ आरतीया हा ८० टक्के भागीदार असल्याचे सांगितले.

कारवाईदरम्यान पंचांसमक्ष रोख ४ हजार आणि ५० हजार रुपयांचे मोबाईल फोन १४ असा एकूण ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी विमानतळ ठाण्यात गु.र.नं. ३६८/२०२६, अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम कलम ४, ५, ६ व ७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास विमानतळ पोलीस करत आहेत. ही कारवाई पोनि अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गोविंद खैरे व त्यांच्या पथकाने केली.

# वीज खंडित आणि डीपी विलंबावर आ. बोंढारकर आक्रमक; अधिकाऱ्यांना कारवाईचा इशारा



**नांदेड (प्रतिनिधी)**– शहरासह ग्रामीण भागातील कृषी, व्यावसायिक आणि सर्वसामान्य वीज ग्राहकांना सुरळीत व २४ तास वीजपुरवठा करण्यात यावा, रखडलेली वीजविषयक कामे तातडीने पूर्ण करावीत, कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना पाठीशी घातले जाणार नाही, असा स्पष्ट इशारा आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिला.

नांदेड दक्षिण मतदारसंघातील वीजपुरवठ्याच्या विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी आमदार बोंढारकर यांनी तरोडा नाका येथील महावितरण कार्यालयात संयुक्त बैठक घेतली.

या बैठकीला अधीक्षक अभियंता संजय खंडारे, कार्यकारी अभियंता शैलेश कलंत्री, अतिरिक्त कार्यकारी अभियंता एस. एन. कांबळे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि नांदेड दक्षिण मतदारसंघातील सर्व लाईनमन उपस्थित होते. शिवसेना शहरप्रमुख तुळजेश यादव, युवासेना जिल्हाप्रमुख बाळू पाटील मोरे, महानगरप्रमुख दीपक स्वामी, संतोष जाधव यांचीही उपस्थिती होती.

नांदेड दक्षिण मतदारसंघात वीजपुरवठा सुरळीत नसल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होत आहेत. या मतदारसंघात एमआयडीसीसह अनेक उद्योग-व्यवसाय आहेत. तसेच मोठ्या प्रमाणावर शेती असल्याने सिंचनासाठी वीजपुरवठा महत्त्वाचा आहे. मात्र वारंवार वीज खंडित होत असल्याने उद्योग, शेती आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

एखाद्या परिसरातील डीपी जळाल्यानंतर तो अनेक दिवस बदलला जात नाही, त्यामुळे संबंधित भागातील वीजपुरवठा विस्कळीत राहतो. डीपी बसवल्यानंतरही वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या तक्रारी आहेत.

### आमदारांचे महत्त्वाचे निर्देश

जळालेले डीपी तातडीने बदलून नवीन डीपी बसवावेत. मतदारसंघातील सर्व वीज उपकेंद्रांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत. नवीन सर्व्हिस स्टेशनची कामे वेळेत पूर्ण करावीत. शेतीपंप आणि घरगुती ग्राहकांसाठी स्वतंत्र व्यवस्था करून सुरळीत वीज द्यावी.

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम –२

# पहिल्या आठवड्यात ३६१ गुन्ह्यांमध्ये ४ कोटींचा मुद्देमाल हस्तगत

**नांदेड (प्रतिनिधी)** –पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांचे मार्गदर्शनाखाली नांदेड परिक्षेत्रात दि. १ ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान, गुटखा, मटका – जुगार, अवैध दारु विक्री, शस्त्र अधिनियम व इतर कलमान्वये अवैध व्यवसाय निर्मूलन मोहीम –२ राबविण्यात येत आहे.

या मोहिमेअंतर्गत, दिनांक ०१ ते ०७ ऑगस्ट, २०२६ दरम्यान संपलेल्या पहिल्या आठवड्यात नांदेड परिक्षेत्रात गुटखा व्यावसायिकांविरुद्ध कलम १२३ भारतीय न्याय संहिते अंतर्गत ९, महाराष्ट्र जुगार कायद्यांतर्गत ७६, महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये २१२, शस्त्र अधिनियमान्वये १४, तर इतर अधिनियमांखाली ५०, अशा एकूण ३६१ कारवाया करुन ५१२ इसमांविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यात निष्पन्न झालेल्या आरोपीतांकडून ४ कोटी ३ लाख ७१ हजार ९१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

# हडको ज्ञानेश्वर नगरातील भूमिगत पाईप लाईनच्या अपूर्ण कामावर नागरिकांचा संताप



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – हडको येथील ज्ञानेश्वर नगर परिसरात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुतर्फा सुरू असलेल्या अंडरग्राउंड पावसाच्या पाण्याच्या पाईपलाईन व नालीच्या कामातील अर्धवट कामामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

रस्त्याच्या दुतर्फा अर्धवट राहिलेल्या अंडरग्राउंड पावसाच्या पाण्याच्या पाईपलाईनमध्ये पाणी अडकल्याने ते रस्त्यावर येत होते. ही समस्या सोडविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी रस्ता खोदून दुसऱ्या अंडरग्राउंड पावसाच्या पाण्याच्या पाईपलाईनला जोडणी देण्याचे काम करत होते. मात्र संबंधित लाईन अपूर्ण असून, पराग इलेक्ट्रिकल्स (लोसरवार) यांच्या घरासमोर ती उघडी असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले.

नागरिकांनी याला तीव्र विरोध केल्यानंतर शिवसेना दक्षिण जिल्हाप्रमुख विनय पाटील गिरडे यांनी भेट देऊन संबंधित अधिकारी, अभियंता व कर्मचाऱ्यांना जाब विचारला. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी सुरू असलेले काम थांबवून अपूर्ण असलेल्या पाईपलाईनमध्ये सोडण्यात आलेले पावसाचे पाणी सिमेंट काँक्रीट टाकून बंद केले. सिडको-हडको परिसरातील अंडरग्राउंड पावसाच्या पाण्याच्या पाईपलाईनचे अपूर्ण काम प्रथम पूर्ण करावे. त्यानंतरच जोडण्या द्याव्यात, अशी मागणी केली.

नगरसेवक प्रतिनिधी सतीश पाटील बसवदे यांनीही संबंधित कामकाजाबाबत नाराजी व्यक्त करत अंडरग्राउंड पावसाच्या पाण्याच्या पाईपलाईनचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

# हनुमानगड ते काळेश्वर कावड यात्रेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –मॉ तुळजा भवानी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने सलग नवव्या वर्षीच्या कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले असून, सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी श्रीक्षेत्र हनुमानगड ते श्रीक्षेत्र काळेश्वर मंदिर विष्णुपुरीपर्यंत जाणार आहे.

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी श्रीक्षेत्र हनुमानगड ते श्रीक्षेत्र काळेश्वर मंदिर विष्णुपुरी येथे कावड यात्रा जाणार आहे. सोमवार, दि. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता श्रावण महिन्याच्या पावन तिसऱ्या सोमवारी या कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले असून, सर्व शिवभक्तांनी या कावड यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन आयोजक समितीचे रविसिंह चौहान, संतोष औंढेकर, माधवसिंह ठाकूर, सुनील डोईजड, ओमसिंह परमार, संतोष शिंदे, विनोद देशमुख, साई परिहार यांनी केले आहे.

# किनवट बाजार समितीच्या सचिवांवर निलंबनाची कारवाई

## २.५२ कोटींच्या मुदत ठेवींच्या गैरव्यवहाराचा ठपका

**किनवट (प्रतिनिधी)** –येथील कृषी उत्पन्न बाजार समितीतील सत्तासंघर्षाला शनिवार, दि. ८ ऑगस्ट रोजी नवे वळण मिळाले. बाजार समितीचे सचिव रवींद्र राठोड यांना आर्थिक गैरव्यवहारासह विविध आरोपांच्या चौकशीनंतर दोषारोप सिद्ध झाल्याच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या विशेष सभेत निलंबित करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. सभापती तथा पदसिद्ध अध्यक्ष गजानन मुंडे गैरहजर असल्याने उपसभापती राहुल गेमसिंग नाईक यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा पार पडली.

पणन संचालक शरद जरे यांच्या आदेशानुसार झालेल्या कारवाईत बाजार समितीच्या २ कोटी ५२ लाख ८६ हजार ६७५ रुपयांच्या मुदत ठेवी कथितरीत्या बेकायदेशीरपणे उचलून खासगी कामासाठी वापरल्याचा ठपका सचिव राठोड यांच्यावर ठेवण्यात आला आहे. या प्रकरणासह बाजार समितीतील अन्य गैरव्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय संचालक समिती गठीत करण्याचा ठरावही मंजूर करण्यात आला. या समितीत संचालक सोपानराव केंद्रे, श्रीराम कांदे आणि प्रल्हाद सातव यांचा समावेश आहे. समितीने वस्तुनिष्ठ चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. राठोड यांच्या जागी विकल रंगनेनीवार यांची प्रभारी सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.

दरम्यान, सभापती गजानन मुंडे यांनी दोन महिला संचालकांच्या तक्रारीचा आधार घेत उपसभापतींसह काही संचालकांना बरखास्त केल्याचा दावा केला होता. मात्र, महिला संचालक कुसुम गणपत मुंडे आणि अनुसया मनोहर पेंदोर यांनी त्यांच्या नावाने खोटे अर्ज तयार करून दिशाभूल केल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणी सहायक उपनिबंधक, सहकारी संस्था, किनवट यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विशेष सभेला १७ संचालक उपस्थित होते. त्यामुळे बाजार समितीतील सत्तासंघर्ष आता अधिक तीव्र झाला आहे.

**सभापतींचा बैठकीवरच आक्षेप**

उपसभापती राहुल नाईक यांनी दि. १५ एप्रिल रोजी सभापती व सचिवांकडे राजीनामा दिला असून तो मंजूरही करण्यात आला आहे. त्यामुळे सचिवांच्या निलंबनासाठी बोलावलेली आजची सभा व त्यातील ठरावच नियमबाह्य असल्याचा दावा सभापती गजानन मुंडे यांनी केला. बैठकीतील ठराव करण्याचा राहुल नाईक यांना अधिकार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे या निर्णयाविरोधात पुढील कायदेशीर व प्रशासकीय कारवाई होण्याची शक्यता आहे. सचिवांच्या निलंबनानंतर बाजार समितीतील आर्थिक व्यवहार, संचालकांच्या कथित बरखास्तीचे प्रकरण आणि विशेष सभेच्या वैधतेवरून संघर्ष आणखी पेटण्याची चिन्हे आहेत.

# उपवर्गीकरणाच्या विरोधात नांदेडमध्ये आज भव्य मोर्चा

## खासदार चंद्रकांत हंडोरे करणार मोर्चाला संबोधित; भीमशक्तीच्या पदाधिकाऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)** –अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात नांदेड येथे रविवार, दि. ९ ऑगस्ट रोजी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाला भीमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार आणि महाराष्ट्राचे माजी सामाजिक न्यायमंत्री चंद्रकांत हंडोरे संबोधित करणार आहेत.

खा. हंडोरे यांचे रविवारी सकाळी ८ वाजता नांदेड येथे आगमन होणार असून, उपवर्गीकरणाच्या विरोधातील या मोर्चात जिल्ह्यातील भीमशक्ती सामाजिक संघटनेचे सर्व पदाधिकारी, तालुकाध्यक्ष, महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यातील भीमशक्तीच्या पदाधिकाऱ्यांची व कार्यकर्त्यांची उपस्थिती वाढविण्यासाठी संघटनेने आवाहन केले आहे. जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांतील अध्यक्ष तसेच वरिष्ठ नेते, महिला आघाडीच्या पदाधिकारी आणि जिल्हास्तरीय महिला भगिनींनी मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

हे आवाहन भीमशक्ती महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस डॉ. दिनेश निखाते, जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न वाघमारे (दक्षिण विभाग), जिल्हाध्यक्ष सुरेश हाटकर (नांदेड उत्तर), शहराध्यक्ष संजय कवठेकर, भीमशक्ती विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश दिपके तसेच महिला आघाडीच्या सुमनताई निखाते, विमलताई कीर्तने, शिंदेताई यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले आहे. 'चलो नांदेड' या आवाहनाला प्रतिसाद देत भीमशक्तीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

# अर्धापूर पोलिसांची कामगिरी; ३ गंभीर गुन्हे उघड, ६ आरोपी जेरबंद, १.९३ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)**– पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यांचा प्रतिबंध व उघडकीस आणण्यासाठी राबविलेल्या विशेष मोहिमेत अर्धापूर पोलीस पथकाने यश मिळवले आहे. अथक परिश्रम, तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे ३ गंभीर गुन्ह्यांची उकल करून ६ आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून चोरीचा पोषण आहार, २ मोटारसायकली व मोबाईल फोन असा एकूण १ लाख ९३ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


दि. ४ ते ५ ऑगस्ट रोजी अज्ञात आरोपींनी खरब, अर्धापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे कुलूप तोडून विद्यार्थ्यांसाठीचा ३० हजार ८५० रुपये किमतीचा पोषण आहार व साहित्य चोरून नेले होते. याप्रकरणी गु.र. क्र. ४३२/२०२६, भा.न्या.सं. कलम ३३१ (४), ३०५(अ) अन्वये गुन्हा दाखल होता. तपासात जमील खान अंबीया खान (वय १९), रा. महमदियानगर व शेख शाहेद शेख चाँद (१९ वय), रा. खुबा कॉलनी यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्याकडून १०० टक्के मुद्देमाल जप्त करण्यात आला.

खुबा कॉलनी, अर्धापूर येथून फिर्यादी असिफ खान यांची हिरो स्प्लेंडर आणि सय्यद अली यांची मोटारसायकल चोरीला गेली होती. गु.र. क्र. ४३३/२०२६, कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल होता. सीसीटीव्ही व तांत्रिक माहितीच्या आधारे शेख शाहेद शेख चाँद (वय १९) व शेख सुलेमान शेख जिलानी उर्फ पप्पू (वय २२), रा. बोंढार हवेली, नांदेड यांना अटक केली.













**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com